काव्य
२३२८

# सुमन कल्याणपूर

## यांची गाजलेली गाणी

REFBK-0026463
REFBK-0026463

39190
29

# सुमन कल्याणपूर

## यांची गाजलेली गाणी

भक्तिगीते, भावगीते, चित्रपट गीते
यांचा अप्रतिम संग्रह

REFBK-0026463
REFBK-0026463

संग्राहिका
सौ. सुचिता प्रभाकर आवटी

योगेश्वर प्रकाशन डोंबिवली (पूर्व)

योगेश्वर प्रकाशन, डोंबिवली (पूर्व)

प्रकाशिका :
सौ. सुचिता प्रभाकर आवटी
योगेश्वर प्रकाशन
'सुधास्मृती सागर', अ विभाग
ब्लॉक क्र. ८, आयरे क्रॉस रोड,
डोंबिवली (पूर्व) जिल्हा - ठाणे.

प्रथमावृत्ती : ऑगस्ट १९९१

मूल्य : रु. २०/-

टाईपसेटिंग :
मेकग्राफिक्स
३/१४, कॅनॉट रोड, हॉटेल अमीर समोर
पुणे - ४११ ००१. फोन : ६६७७५२

मुद्रक :
प्रदीश मुद्रण
१८० सी, गायवाडी
गिरगांव, मुंबई - ४

## अनुक्रमणिका

### भक्तिगीते


हेचि थोर भक्ति आवडते १
चंदनाचे हात पायही चंदन २
सोनसकाळ झाली ३
पक्षिणी प्रभाती ४
हले हा नंदाघरी पाळणा ५
राम राम राम ६
क्रूर अक्रूरा नकोस ७
शांती परते नाही सुख ८
गणाधिपा हो उठा लवकरी ९
जयदेव जयदेव जय गिरिजा कुमारा १०
जो त्रिगुणांची मुर्त ११
देवगृही या भक्तजनांना १२
नंदाघरी नंदनवन फुलले १३
अभंगाची गोडी १४
ओंकार प्रधान रूप १५
बुडता आवरी मज १६
क्षणी या दुभंगुनीया १७
हरि आला ग माझ्या अंगणी १८
समाधी घेऊन जाई ज्ञानदेव १९
एकतारी सूर जाणे २१
दीनाचा कैवारी दुःखिता सोयरा २२
लाखात लाभले भाग्य २३
चल उठ रे मुकुंदा २४
थांबली बहिणाई दारी २५
देह शुद्ध करूनी २६
सावळ्या विठ्ठला २७
देव माझा विठू सावळा २८
पदी घुंगुर वाजती रे २९
जेथे जातो तेथे ३०
घेई घेई माझे वाचे ३१
मधुवंतीच्या सुरासुरातुनी ३२
ही नव्हे चांदणी ३३
मायेवीण बाळ क्षणभर ३४
देव भावाचा भुकेला ३५
निंदती हे लोक जरी ३६
अजुनी नाही जागी ३८
जगी ज्यास कोणी ३९
लपून बसली राधा ४०
हसतील मजला कबीर ४१
हास रे हृदयी ४२
ॐ नमो हा सूर जिथे ४३
श्रीरंगा हो ध्यास जिवाला ४४
आकाश पांघरोनी ४५
केशवा माधवा ४६
या मीरेचे भाग्य उजळले ४७
अजाण आम्ही तुम्ही लेकरे ४८
चक्रवाक पक्षी वियोगे ४९
नाम आहे आदि अंती ५०
श्रीरामाचे चरण धरावे ५१

## भावगीते


| | |
|---|---|
| या लाडक्या मुलांनो | १ |
| सहज तुला गुपित एक | २ |
| पिवळी पिवळी हळद | ३ |
| प्रीत सागरी तुझ्या स्मृतीचे | ४ |
| नाविका रे वारा वाहे रे | ५ |
| वाट इथे स्वप्नातील | ६ |
| असावे घर ते आपुले छान | ७ |
| पांखरा जा | ८ |
| नकळत सारे घडले | ९ |
| ते नयन बोलले कांहीतरी | १० |
| हसण्याचे बहुमोल उमगते | ११ |
| रे क्षणांच्या संगतीने | १३ |
| मृदुल करांनी छेडित तारा | १४ |
| काल राती स्वप्नामध्ये | १५ |
| दिन रात तुला मी स्मरु | १७ |
| लाजवी मला हे नांव गडे | १८ |
| आंस आहे अंतरी या | १९ |
| उतरली सांज ही धरेवरी | २० |
| या गडे हांसू या | २१ |
| सकल मिळुनी हसुनी | २२ |
| या कळ्यांनो या फुलांनो | २३ |
| या झोपल्या जगात | २४ |
| पाण्यातली परी मी | २५ |
| दीपका मांडिले तुला | २६ |
| आली बघ गाई गाई | २७ |
| उठा उठा चिऊताई | २९ |
| चंद्राचे चांदणे जणु | ३१ |
| वल्हव रे वल्हव | ३२ |
| एकदाच यावे सखया | ३३ |
| शब्द शब्द जपुनी ठेव | ३४ |
| मी बोलले न कांही | ३५ |
| तुला ते आठवेल कां | ३६ |
| ते हात असे जुळलेले | ३७ |
| रिमझिम झरती | ३९ |
| आले मनांत माझ्या | ४१ |
| पैंजण रूमझुमले | ४२ |
| वाऱ्यावरती घेत | ४३ |
| जुळल्या सुरेल तारा | ४४ |
| रात्र आहे पौर्णिमेची | ४५ |
| बोलुन प्रेम बोल | ४६ |
| अरुण उगवला | ४७ |
| मी चंचल होऊन | ४८ |
| उर्मिला मी निरोप | ५० |
| मी नाही तू | ५१ |
| कुणीतरी पाही बाई | ५२ |
| दारी पाऊस पडतो | ५३ |
| आला गं बाई अंगणी | ५४ |
| घाल घाल पिंगा | ५५ |
| केतकीच्या बनी | ५७ |
| कुणी निंदावे | ५८ |
| पैलतिरी रानामधी | ६० |

## चित्रपट गीते


| | |
|---|---|
| देवा दया तुझी की | १ |
| बोलू दे लोकां हवे ते | ३ |
| आई सारखे दैवत साऱ्या | ५ |
| जिथे सागरा धरणी मिळते | ७ |
| असा मी काय केला गुन्हा | ८ |
| चांदणे झाले ग केशरी | १० |
| जाग रे यादवा | १२ |
| कशी गौळण राधा बावरली | १४ |
| दहा वीस असती त्या रे | १६ |
| पार्वती वेची मृदुल करे | १८ |
| दिवा पाहूनी लक्ष्मी येते | २० |
| आशा मनात झुरते | २२ |
| दूर राहिले जग स्वार्थाचे | २३ |
| सांग कधी कळणार तुला | २५ |
| कालिंदीच्या तीरी मधुर ही | २६ |
| निंबोणीच्या झाडामागे | २७ |
| दे मला तू साथ वीणे | २८ |
| तुझ्या कांतीसम रक्तपताका | २९ |
| कशी करु स्वागता | ३१ |
| ये ना जवळी | ३३ |
| अरे संसार संसार | ३४ |

# भक्तिगीते

१ काव्य २६२६ दा. क्र. २६४८० उपाध्ये

# हेची थोर भक्ती आवडते

संगीत - कमलाकर भागवत

गीत - संत तुकाराम

हेचि थोर भक्ती आवडते देवा
संकल्पाची माया संसाराची
ठेविले अनंते तैसेची रहावे
चित्ती असो द्यावे समाधान
वाहिल्या उद्वेग दुःखाची केवळ . . . २
भोगसी ते फळ संसाराचे . . . २
तुका म्हणे घालु तयावरी भार
सोड हा संसार देवापायी

• • •

# चंदनाचे हात पायही चंदन

संगीत - कमलाकर भागवत

अभंग - संत तुकाराम

चंदनाचे हात पायही चंदन
परिसा नाही हीन कोणी अंग ॥धृ० ॥

दीपा नाही पाठी पोटी अंध:कार
सर्वांगे साकर अवघी गोड ॥१॥

तुका म्हणे तैसे सज्जनापासुन
पाहता अवगुण मिळेची ना ॥२॥

• • •

# सोनसकाळ झाली

संगीत - अशोकजी पत्की

गीत - अशोकजी पत्की

सोन सकाळ झाली वारा गाणे गाई
आली नटुनी थटुनी हो श्रावणी गौराबाई ।।धृ०।।

हार गुंफीले फुलांचे तोरणे सजली
बघ माय माझी चौरंगी शोभली
धनधान्य लाभे, तुझी कृपा आई
आली नटुनी ।।१।।

देते सौभाग्य अखंड, हळदीकुंकु घ्या ग
हिरवा चुडा दान देवीचे घ्या ग
झाले मंगल जीवन तुझी कृपा आहे
आली नटुनी ।।२।।

• • •

# पक्षिणी, प्रभाती चारियासी जाये

संगीत - यशवंत देव

गीत - संत नामदेव

पक्षिणी प्रभाती चारियासी जाये
पिलू वाट पाहे उपवासी ।।धृ०।।

तैसे माझे मन धरी वो तुझी आस
चरण रात्रंदिवस चिंतीतसे ।।१।।

तान्हे वत्स घरी बांधलेस देवा
तया हृदयी धावा माऊलीचा ।।२।।

नामा म्हणे देवा तूं माझा सोयरा
झणी मज अव्हेरा अनाथ नाथा ।।३।।

• • •

# हले हा नंदाघरी पाळणा

संगीत - वसंत प्रभू

गीत - मधुकर जोशी

हले हा नंदाघरी पाळणा, हले हा नंदाघरी पाळणा
त्यात देखणा गोजिरवाणा हंसतो गोकुळ राणा ।।धृ०।।

ओठ लाल हे डोळे चिमणे, हास्यांतूनि त्या फुले चांदणे
स्वरूप सुंदर लोभसवाणे मोहुन घेई मना ।।१।।

बोल बोबडे ते भाग्याचे शब्द वाटती ते वेदांचे
रूणझुणता ती घुंगुरवाळे ये धेनुंना पान्हा ।।२।।

नंद यशोदा करती कौतुक आनंदाचे अमाप ते सुख
माय पित्याविण कसे कळावे सौख्य तयाचे कुणा ? ।।३।।

• • •

# राम राम राम

संगीत - कमलाकर भागवत

गीत - संत तुकाराम

राम राम राम अवघेची म्हणती
कोणी न जाणीती आत्माराम
राम हा कालचा पुत्र दशरथाचा
अनंत युगाचा आत्माराम
रामासी हा राम ठावे जरी
शरण का जाता वसिष्ठासी
तुका म्हणे राम तुझा तुजपाशी
विचारूनी घेसी गुरूमुख

• • •

# क्रूर अक्रूरा नकोस नेऊ

संगीत - दशरथ पुजारी

गीत - योगेश्वर अभ्यंकर

क्रूर अक्रूरा नकोस नेऊं आनंदाचा ठेवा ।
नेऊ नको माधवा ।।धृ०।।
खेळगडी तो गोपाळांचा
गिरीधारी रे भक्तजनांचा
नारी गोकुळ कान्हा आमुचा
सर्व सुखाचा अमोल ठेवा ।।१।।
कुंजवनी रे रास रंगली
तालावरती टिपरी घुमली
धुंद रात्र रे स्वप्नी उरली
ऐकू दे मज मंजुळ पावा ।।२।।
नकोस नेऊ बाल मुकुंदा
वेडी होईल गौळण राधा
तुला विनविती नंद यशोदा
अक्रूरा नेऊ नको माधवा ।।३।।

• • •

# शांती परते नाही सुख

संगीत - कमलाकर भागवत

गीत - संत तुकाराम

शांतिपरते नाही सुख
येर अवघेची दुःख
म्हणवुनि शांति तीरा
उतराल पैल तीरा
खवळलिया काम क्रोधी
अंगी भरती आधी व्याधी
तुका म्हणे त्रिविध ताप
जाती मग आपोआप

• • •

# गणाधिपा हो उठा लवकरी

संगीत - कमलाकर भागवत

गीत - सरस्वतीनंदन

गणाधिपा हो उठा लवकरी, पूर्वदिशा उजळली
स्थिरचर अवघे जागे झाले पंचारती सजली ।।धृ०।।
अष्टविनायक तुम्ही होऊनी गिरीकंदरी राहिला
मराठदेशी गिरिजाकुमरा हृदयी तुज पुजिला
गोधन घेऊन गोप चालले वसुंधरा हर्षली
गणाधिपा हो उठा लवकरी . . . ।।१।।
विघ्न नाशुनी परशुधरानी जगा ज्ञान दिधले
ऋद्धिसिद्धि दोघी वरूनी कलादान केले
देवगृही रे सिद्धिविनायक तवपूजा चालली
गणाधिपा हो उठा लवकरी . . . ।।२।।
मोदक केले नैवेद्यासी अष्टगंध अर्पिले
कमलपुष्प हे शोभे तबकी दुर्वांकुर सजले
दर्शन घेण्या अधिर जाहली जनता ही माऊली
गणाधिपा हो उठा लवकरी . . . ।।३।।

• • •

# जयदेव जयदेव जय गिरिजा कुमरा

संगीत - कमलाकर भागवत

गीत - सरस्वतीनंदन

जयदेव जयदेव जय गिरिजा कुमरा
ओवाळू आरती तुजला ओंकारा ॥धृ०॥
परशू हाती घेऊनी विघ्ना नाशियले
मंगलदायक होऊनि भक्त तोषविले
कृपा करूनि तू पतिता उद्धरिले
रावा रंका सर्वा पावनही केले ॥१॥
शंकर पार्वती पाहुनि तव लीला
हर्षे मोदक देती तुजला वेल्हाळा
नाग शोभे उदरी कंठी मणिमाळा
मूषक वाहन घेऊनी करिशी प्रतिपाळा ॥२॥
देवगणांनी तुजला स्वर्गी पूजियले
मुनिजन योगीयांनी ध्यानी प्रार्थियले
भक्तजनांनी नाथा हृदयी बैसविले
'मी' पण आता अवघे सरोनिया गेले ॥३॥

• • •

# जो त्रिगुणांची मूर्त जाहला

संगीत - कमलाकर भागवत | गीत -सरस्वतीनंदन

जो त्रिगुणांची मूर्त जाहला
ओंकारी नटला
गजानन स्तविला मी नमिला ।।धृ०।।
गौरीचे हे सुंदर बालक
विश्वाधारू रे जगचालक
युगायुगातुन कार्यारंभी
सर्वपूज्य मानिला,
गजानन स्तविला मी नमिला ।।१।।
भारत हाती घेई लिहुनि
दे विद्येचे पसाय आणुनी
कलानिधी हा महागणपती
रसिकमनी तोषला
गजानन स्तविला मी नमिला ।।२।।
गणराया हा नृत्यविशारद
स्मरण जयाचे दुजे मोक्षपद
गिरिजानंदन प्रसन्न होऊनी
भक्तजना पावला
गजानन स्तविला मी नमिला ।।३।।

• • •

# देवगृही या भक्तजनाना

संगीत - कमलाकर भागवत

गीत - सरस्वतीनंदन

देवगृही या भक्तजनांना गौरीनंदन पावला
सिद्धिविनायक शूर्पकर्ण हा चिंतामणि ग लाभला ।।धृ०।।

महागणपती आज येतसे आमुच्या हृदय मंदिरी
मेधा, प्रज्ञा घेऊनी येई कांती सुवर्ण साजिरी
एकदंत हा विघ्ननाशना परशू घेऊनि धावला ।।१।।

सौभाग्याचे दान देतसे अमोघसिद्ध हासुनि
पावित्र्याचे श्रेष्ठ रूप हे नयनी राहे येऊनी
गणेश नर्तन आज करितसे मंगलमूर्ती शोभला ।।२।।

आरोग्याचा दाता गणपती शारदापती पहिला
वादकुशल त्या विनायकाला देवगणांनी पूजिला
सुमंगलाचा दायक विधी हा धरणीधर ग जाहला ।।३।।

• • •

# नंदाघरी नंदनवन फुलले

संगीत - दशरथ पुजारी

गीत - योगेश्वर अभ्यंकर

नंदाघरी नंदनवन फलेले
बोल बोबडे श्रीरंगाचे
गोकुळात घुमले ।।धृ०।।

रिंगण घाली शाम सावळा
बाळकृष्ण तो रांगत आला
हात धरूनी चालू लागला
पुढे पुढे ग पडती पाऊले ।।१।।

हात चिमुकला उंच नाचवी
छुम छुम वाळा मधुर वाजवी
स्वतः हासुनि जगास हसवी
कौतुक करते गोकुळ सगळे ।।२।।

• • •

# अभंगाची गोडी

संगीत - दशरथ पुजारी

गीत - शांताबाई जोशी

अभंगाची गोडी करी ज्यास वेडी
तोचि पुण्य जोडी पंढरीचे ।।धृ०।।

टाळ मृदुंगाची वीणा साथ ज्याची
भक्ति पाहे तोचि विठ्ठलाची ।।१।।

बघा संतमेळा सदा रंगलेला
तीरी बैसलेला देवापाशी ।।२।।

गाभाऱ्यात कोण उभा विठू जाण
चोखोबा तिष्ठत अंगणात ।।३।।

माहेर आपुले मंदिर तेथले
संत गुंतलेला भजनात ।।४।।

पहा हा सोहळा मोक्षाचा उमाळा
पुण्य पदराला बांधावे हो ।।५।।

• • •

# ओंकार प्रधान रूप

संगीत - कमलाकर भागवत

गीत - संत तुकाराम

ओंकार प्रधान रूप गणेशाचे
हे तिन्ही देवांचे जन्मस्थान ।।धृ०।।

अकार तो ब्रह्मा उकार तो विष्णु
मकार महेश जाणियला ।।१।।

ऐसे तिन्ही देव जेथोनी उत्पन्न
तो हा गजानन मायबाप ।।२।।

तुका म्हणे ऐसी आहे वेदवाणी
पहावी पुराणी व्यासाचीया ।।३।।

• • •

# बुडता आवरी मज

संगीत - कमलाकर भागवत

अभंग - संत तुकाराम

बुडता आवरी मज
भवाचे सागरी ॥धृ०॥

नको मानु भार
पाहो दोषांचे डोंगर ॥१॥

आहे ते सांभाळी
तुझी कैसी ब्रीदावळी ॥२॥

तुका म्हणे दोषी मी तो
पातकांच्या राशी ॥३॥

• • •

# क्षणी या दुभंगुनीया

संगीत - दशरथ पुजारी

गीत - यशोदाकुमार गवळणकर

क्षणी या दुभंगुनीया घेई कुशीत माते
अश्राप भूमिकन्या तुज आज आळविते ।।धृ०।।

मम अग्नि दिव्यगाथा त्रैलोक्य गात असता
शंका जनी पुन्हा कां, कां त्याग भाळी होता
नुसतीच वंचना ही - हे न्यायदान खोटे ।।१।।

कोटी रघुकुला कर जपण्यास प्राण धरिले
प्रतिराम करुनी बाळ कर्तव्य पार झाले
पुत्रास तात मिळती परि मी वनात उरते ।।२।।

बघ देह अन् मनानी पति निष्ठाच जपली
ध्यानी तशीच स्वप्नी वैदेही राम स्मरली
सतीधर्म ब्रीद माझे लावुनिया पणाते ।।३।।

• • •

# हरि आला ग माझ्या अंगणी

संगीत - यशवंत देव

गीत - स. अ. शुक्ल

लुटुलुटु धावत, खुदुखुदु हासत
हरी आला ग माझ्या अंगणात ।

रुणझुणती वाळा, करि लाडिक चाळा
नाचे कान्हा माझ्या अंगणी ।

जाईजुई फुलली, जिवाची कळी खुलली
बघ चिमण्या अधरी कशी गं बाई धरी चिमणी मुरली ।

त्याला गोजिरवाणी नवलाईची लेणी
नंदकिशोर आला गं अंगणी ।

बालमुकुन्द गुणी जणू सखे साजणी
ब्रह्म सानुले खेळते अंगणी ।

• • •

# समाधी घेऊन जाई ज्ञानदेव

संगीत - कमलाकर भागवत

गीत - अशोकजी परांजपे

समाधी घेऊन जाई ज्ञानदेव
सोहळा अपूर्व जाहला गे माये ।।धृ०।।

निवृत्ती नाथानी चालवीले हाती
पाहुन ती मूर्ती धन्य वाटे
आपण निर्गुण मागे परी दान
विश्वाचे कल्याण निरूपण ।।१।।

सोपान मुक्ताबाई झाली व्याकुळ
मायेचे हे बळ राया बोले
ब्रह्याशी ही गाठ अमृताचे ताट
फुटली पहाट ब्रह्यज्ञान ।।२।।

नीर वाहे डोळा वैष्णव नाचतो
वैकुंठासी जातो ज्ञानराया
सोन्याचा पिंपळ झालासे निश्चळ
सज्जनाचे बळ समाधान ।।३।।

गुरू देई शिष्या समाधी आपण
देवा ऐसे मन का बा केले ?
पद्माचे आसन घालविले जाण
ओंकार ते पूर्ण पंचप्राण ॥४॥

पैलतिरी हाक आली आज कानी
करूनी निर्वाणी बोलविले
ज्ञानाचा पुतळा तेजी विसावला
कैवल्याचि झाला भक्तजन ॥५॥

• • •

# एकतारी सूर जाणे

संगीत - दशरथ पुजारी

गीत - यशोदाकुमार मालवणकर

कृष्णगाथा एक गाणे जाणते ही वेंखरी
एकतारी सूर जाणे "श्रीहरी जय श्रीहरी" ।।धृ०।।

तूं सखा तूं पाठीराखा तूंच माझा ईश्वर
राहिला व्यापूनिया तू , तूंच माझे अंतर
आळविते नाम ज्याला अमृताची माधुरी ।।१।।

पाहते मी सर्व ते ते कृष्णरूपी भासते
रोज स्वप्नी माधवाच्या संगती मी नाचते
ध्यानरंगी रंगताना ऐकते मी बासरी ।।२।।

तारिलेसी तूं कन्हैय्या दीनवाणे बापुडे
हीन मीरा त्याहुनी भाव भोळे भाबडे
दे सहारा दे निवारा या भवाच्या संगरी ।।३।।

• • •

# दीनाचा कैवारी दुःखिता सोयरा

संगीत - कमलाकर भागवत | गीत - अशोकजी परांजपे

दीनाचा कैवारी दुःखिता सोयरा
मुला माणसांत माझा विठ्ठल साजिरा ।।धृ०।।

वेदनेत जन्मे हरी संकटात रांगे
दरिद्र्याच्या झोपडीत गीता नित्य सांगे
दलितांच्या माथा धरितो मायेचा पिसारा ।।१।।

शेतातल्या चिखलामध्ये उभारे श्रीरंग
घाम सांचला निढळी भिजे त्याचे अंग
उब देतो थंडीमाजी पिऊनी निखारा ।।२।।

देव नाही राउळात नाही त्या आकार
देव आहे तुमचा आमुचा मानवी आचार
तापलेल्या पाऊलांना होई जो आसरा ।।३।।

• • •

# लाखात लाभले

संगीत - दशरथ पुजारी

गीत - शांताबाई जोशी

लाखात लाभले भाग्य तुला ग बाई
विटेवरच्या विठ्ठलाची झालीस रखुमाई ।।धृ०।।

मेघासम जो हंसरा श्यामल
चंद्राहुनी जो अधिक ही शीतल
नाम जयाचे मुखात येता रूप दिसे ग ठाई ।।१।।

भक्तांचा जो असे आसरा
ह्या विश्वाचा हरी माहेरा
क्षणात इकडे क्षणात तिकडे हाकेला ग धांवत येई ।।२।।

• • •

# चल ऊठ रे मुकुंदा

संगीत - दशरथ पुजारी

गीत - सुरेश भट

चल ऊठ रे मुकुंदा झाली पहाट झाली
बाहेर चांदण्याला हलकेच जाग आली ।।धृ०।।

मंदावला कधीचा गगनांत शुक्र तारा
अन् चोर परवलांनी आला पहाट वारा
गालावरी उषेच्या ये हळूच लाली ।।१।।

घे आवरून आता स्वप्नातला पिसारा
बेचैन गोकुळाने केला तुझा पुकारा
तव गीत गात सारी ही पांखरे उडाली ।।२।।

तुज दूर हांक मारी कालिंदिचा किनारा
कुंजातल्या फुलांनी केला तुला इषारा
तुज शोधण्यास वेडी राधासुध्दा निघाली ।।३।।

• • •

# थांबली बहिणाई दारी

संगीत - गोविंद पोवळे

गीत - शांताबाई जोशी

देवळातल्या देवा या हो उतरा ही पायरी
थांबली बहिणाई दारी ।।धृ०।।

अंगणी देवा प्रकाश उजळे, येथे कीर्तन गायन चाले
रूप विठ्ठला तरी सावळे आत उभे का गाभारी ।।१।।

बघ गेल्या ह्या संत विभूती, सम चरणावरी ठेवून भक्ती
हरिनामाची होत आरती पाही सोहळा बाहेरी ।।२।।

मी तर आले स्वये न्यावया, भक्तीची ही वेडी माया
स्वये निघावे दर्शन द्याया, टाळ चिपळ्यांच्या झंकारी ।।३।।

• • •

# देह शुद्ध करूनी

संगीत - कमलाकर भागवत

गीत - जनार्दन महाराज

देह शुद्ध करूनी भजनी भजावे
आणिकांचे न आठवावे दोष गुण ।।धृ०।।

साधने समाधी नको पायी उपाधी
सर्व सम बुद्धी करी मन ।।१।।

म्हणे जनार्दन घेई अनुताप
सोडी बा संकल्प एकनाथा ।।२।।

• • •

# सावळ्या विठ्ठला

संगीत - दशरथ पुजारी

गीत - रा. ना. पवार

सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले
विसरून गेले, देहभान ।।धृ०।।

गोजिरे हे रूप, पाहुनिया डोळा
दाटला उमाळा अंतरी माझ्या
तुकयाचा भाव पाहुनी निःसंग
तारिले अभंग - तूच देवा ।।१।।

जगी कितीकांसी तारिलेस देवा
स्वीकारी ही सेवा आता माझी
कृपा कटाक्षांचे पाजवी अमृत
ठेव शिरी हात पांडुरंगा ।।२।।

• • •

# देव माझा विठू सावळा

संगीत - दशरथ पुजारी

गीत - सुधांशु

देव माझा विठू सावळा
माळ त्याची माझिया गळा ।।धृ०।।

विठू राहे पंढरपूरी वैकुंठच ये भू-वरी
भीमेच्या काठी डुले भक्तीचा मळा ।।१।।

साजिरे रूप सुंदर कटि झळके पितांबर
कंठात तुळशीचे हार कस्तुरी टिळा ।।२।।

भजनांत विठू डोलतो कीर्तनी विठू नाचतो
रंगूनी जाई पाहुनी भक्तीचा ळळा ।।३।।

• • •

# पदी घुंगुर माझ्या वाजती रे

संगीत - दशरथ पुजारी

गीत - श्रीकृष्ण पोवळे

पदी घुंगुर माझ्या वाजती रे
मी तर माझ्या कृष्णाची
होऊनी आले दासी रे ।।धृ०।।

लोक बोलती मीरा वेडी
ज्ञानी म्हणे कुलनाशी रे ।।१।।

राणाजी विष प्याला देई
हांसत मीरा प्राशी रे ।।२।।

मीरेचे प्रभू गिरीधर नागर
सहज मिळे अविनाशी रे ।।३।।

• • •

# जेथे जातो तेथे तूं माझा सांगाती

संगीत - कमलाकर भागवत

अभंग - संत तुकाराम

जेथे जातो तेथे तूं माझा सांगाती
चालविशी हाती धरूनिया ।।धृ०।।

चालो वाटे आम्हा तुझाची आधार
चालविशी भार सवे माझा ।।१।।

बोलू जाता बरळ करीशी ते नीट
नेली लाज धीट केली देवा ।।२।।

अवघे जन मज झाले लोकपाळ
सोयरे सकळ प्राणसखे ।।३।।

तुका म्हणे आता खेळतो कौतुके
झाले तुझे सुख अंतर्बाह्य ।।४।।

• • •

# घेई घेई माझे वाचे

संगीत - सुधीर फडके

अभंग - संत तुकाराम

घेई घेई माझे वाचे, गोड नाम विठोबाचे ।।धृ०।।

डोळे घ्या रे तुम्ही सुख, पहा विठोबाचे मुख
तुम्ही ऐका रे कान, माझ्या विठोबाचे गुण ।।१।।

मन तिथे धाव घेई, राही विठोबाचे पायी
रूप गुंतले लोचन, पायी स्थिरावले मन ।।२।।

देहभान हरपले तुज पाहाता विठ्ठला
तुका म्हणे या जिवा नको सोडू बा विठ्ठला ।।३।।

• • •

# मधुवंतीच्या सुरासुरातुनी

संगीत - यशवंत देव

गीत - मधुकर जोशी

मधुवंतीच्या सुरासुरातनी
आळविते मी नाम
एकदा दर्शन दे घन:शाम ।।धृ०।।
नयनी माझ्या गोकुळ वसले
यमुनेचे जल गाली झरले
राधेपरि मी सर्व वाहिले
सुखशांतीचे धाम, एकदा दर्शन दे ।।१।।
वसंतातले सरले कूजन
तुझ्याविना हे उदास जीवन
शोधित तुजला फिरते वणवण
नाही जिवा विश्राम, एकदा दर्शन दे ।।२।।
दासी मीरा ये दाराशी
घे गिरीधारी तव हृदयासी
या पायाशी मथुरा - काशी
तीर्था परी हे नाम, एकदा दर्शन दे ।।३।।

• • •

# ही नव्हे चांदणी

संगीत - दशरथ पुजारी

गीत - शांताराम नांदगावकर

ही नव्हे चांदणी ही तर मीरा गाते
हरी रूप गोजिरे पूर्व दिशेला फुलते ।।धृ०।।

गगनात रंगले सूर एकतारीचे
रंगात नहाले देह गीत मीरेचे
पक्षीहि निघाले शब्द वेचण्या त्यांचे
हळूहळू नेत्रीचे काजळ रजनी पुसते ।।१।।

ना भान कशाचे रमली ही भक्तीत
ती गीत गुंफते भक्तीचे मुक्तिगीत
तल्लीन श्याम मग होईल रसभावात
भजनात भावना भूपाळीची फुलते ।।२।।

उजळीत कृष्ण हा विश्व आज सोन्याचे
नयनात साठवुनी घेईल कण तेजाचे
देहात माझिया रूप विश्व दीपांचे
ही भावनाच हृदयात या ज्या वसते ।।३।।

• • •

# मायेवीण बाळ क्षणभर

संगीत - कमलाकर भागवत

अभंग - संत तुकाराम

मायेवीण बाळ क्षणभर न राहे
न देखतां होय कासावीस ।।धृ०।।

आणिक उदंड खुणावती तरी
छंद त्या अंतरी माऊलीची ।।१।।

नावडती तया बोल आणिकांचे
देखानिया पाचे माय दृष्टी ।।२।।

तुका म्हणे माझी विठ्ठल माऊली
आणिकांचे बोली चाड नाही ।।३।।

• • •

# देव भावाचा भुकेला

संगीत - कमलाकर भागवत

गीत - संत जनाबाई

देव भावाचा भुकेला
वैकुंठ सोडुनिया आला ।।धृ०।।

पुंडलिके उभा केला
रूप सुंदर सावळा ।।१।।

धरियले कर कटी
सर्वांगी चंदनाची उटी ।।२।।

माळ गळा वैजयंती
दासी जनी ध्यात चित्ती ।।३।।

• • •

# निंदती हे लोक जरी

संगीत - दशरथ पुजारी

गीत - मधुकर जोशी

निंदती हे लोक जरीही
विसर त्यांचे बोलणे
या जगाची रीत आहे
निंदणे, मग वंदणे ।।धृ०।।

लोकपालन करीत होता
तरीही रामा निंदिले
पतिव्रता सीता जरीही
पापी तिजला ठरविले
वाचता रामायणी ते भरुनी येती लोचने ।।१।।

ज्ञानदेवाला जगाने
मारिले पिडिले किती
परि समाधीवरि तयाच्या
आसवे जन ढाळिती
जीवन आहे दो घडीचे उन्ह किंवा चांदणे ।।२।।

... ग्रंथालय ठाणे
२६२६
२६४५०
(३९१)८ म(१)
संग्र शाखा (स्थळ प्रत)

पुत्र होता सारथ्याचा
म्हणुनि कर्णा निंदिले
कवच कुंडले दान देता
लोक वंदू लागले
जे असे भाळी तुझ्या रे, तोवरी तू सोसणे ॥३॥

• • •

# अजुन नाही जागी राधा

संगीत - दशरथ पुजारी

गीत - इंदिरा संत

अजून नाही जागी राधा
अजून नाही जागे गोकुळ
अशा अवेळी पैलतिरावर
आज घुमे का पावा मंजुळ ।।१।।

मावळतीवर चंद्र केशरी
पहाटवारा भवती भणभण
अर्ध्या पाण्यामधे उभी ती
तिथेच टाकुनी अपुले तनमन ।।२।।

विश्वच अवघे ओठा लावून
कुब्जा प्याली तो मुरली रव
डोळ्यामधुनी थेंब सुखाचे
हे माझ्यास्तव हे माझ्यास्तव ।।३।।

• • •

# जगी ज्यास कोणी नाही

संगीत - दशरथ पुजारी

गीत - मधुकर जोशी

जगी ज्यास कोणी नाही, त्यासी देव आहे.
निराधार आभाळाचा, तोचि भार साहे ।।धृ०।।

बाळ सोडूनी ते दिधले कुंतीने जळात
परि राधिकेच्या घरी ते वाढले सुखात
कर्णराज म्हणुनी त्याचे नांव अमर आहे ।।१।।

भक्त बाळ प्रल्हादाला छळिले पित्याने
नारसिंह रूपे त्याला रक्षिले प्रभूने
अलौकिक मूर्ती त्याची अजूनी विश्व पाहे ।।२।।

साधुसंत कबिराला त्या छळती लोक सारे
पांडुरंग रक्षी त्याला प्राशुनी निखारे
आसवेच त्याची झाली दु:खरूप दोहे ।।३।।

• • •

# लपून बसली राधा

संगीत - दशरथ पुजारी

गीत - सुधांशु

लपूनी बसली राधा गौळण
वेडा होऊनी शोधी मोहन ॥धृ०॥

इथे धुंडितो तिथे धुंडितो
न मिळे राधा व्यथित हिंडतो
लपल्या जागी हंसते राधा
श्रीकृष्णाला दु:खी पाहुन ॥१॥

हळवे झाले मन राधेचे
बघवेना ते दु:ख हरीचे
हळूच येऊन नयन झाकीते
हरी नाचतो हर्षे न्हाऊन ॥२॥

वेडी राधा वेडी राधा
फसवूं बघते जगदानंदा
गोपाळांचा बनुन सौंगडी
लीला नाटक दावी मोहन ॥३॥

• • •

# हंसातील मजला कबीर मीरा

| संगीत - | गीत - |
|---|---|

हंसातील मजला कबीर मीरा
हंसतील तुलसीदास
हरी तुझा लागे छंद मनास ।।धृ०।।
कुठे मनीचा क्षुद्र काम तो
कोठे अमृत आस
कुठे सरोवर कुठे पाट तो
तुलना करू कशास ।।१।।
नक्षत्रांकित चंद्र तो
कुठे सानुली कांच
कुठे स्वर्गीचा कल्पतरू
अन कोठे मरवा पाच ।।२।।
कबीर गाई, गाते मीरा
गातो तुलसीदास
गीत भावडे गाऊ कुणा मी
प्रभू घे तुझे तुलाच ।।३।।

• • •

# हांस रे हृदयी

संगीत - दशरथ पुजारी

गीत - पां. तु. पाटणकर

हांस रे हृदयी मम नंदलाल
शोधित डोळे मोहक चाळे
हरवू नको गोपाळा ॥धृ०॥
अधरी मुलायम गोड बासरी
गोड बासरी
स्वर लय· मृदुल रसाळ
हांस रे हृदयी मम नंदलाल ॥१॥
शामल कोमल चरण दलांनी
नृत्य करी ब्रीजलाल
नृत्य करी ब्रीजलाल
हांस रे हृदयी मम नंदलाल ॥२॥
तुझ्या दर्शने करी कृपाळा
करी कृपाळा
माझे भाग्य विशाल
हांस रे हृदयी मम नंदलाल ॥३॥

• • •

# ॐ नमो हा सूर तिथे

संगीत - दशरथ पुजारी

गीत - रमेश अणावकर

ॐ नमो हा सूर जिथे रंगतो
श्रीहरि नित्य तिथे नांदतो ।।धृ०।।

या सुराची महान शक्ती
नित्य आळवी भक्ती मुक्ती
या सुरांचा आश्रय घेता
भाव जिथे डोलतो ।।१।।

चराचरातुनी व्यापुनी उरला
सूर मनोहर जगावेगळा
भक्तीरसातून भक्तजनांना
सौख्य जिथे अर्पितो ।।२।।

नित्य पहाटे प्रसन्न वदने
सूर जपावा शुद्ध मनाने
जपता जपता भान हरपूनी
हर्ष जिथे रंगतो ।।३।।

• • •

# श्रीरंगा हो ध्यास जिवाला

संगीत - कमलाकर भागवत

गीत - चारुशीला गुप्ते

श्रीरंगा हो ध्यास जिवाला दिनरात्री लागला
दयाळा कुठे तुम्ही गुंतला ।।धृ०।।

गजेंद्रमोक्षा धावून गेला पांचालीचे बंधू झाला
आळविता पण मी प्रेमाने सांगा का रूसला ।।१।।

विदुरा घरच्या कण्या भक्षिल्या नाथा सदनी कावडी आणिल्या
भक्त सख्या का हांक ऐकता माघारी वळला ।।२।।

जनी संगे कष्टी झाला सावता माळ्याचा मळा फुलविला
जनी जनार्दन पदवी तुमची आज कशी विसरला ।।३।।

• • •

# आकाश पांघरोनि

संगीत - दशरथ पुजारी

गीत - मधुकर जोशी

आकाश पांघरोनि जग शांत झोपले हे
घेऊन एकतारी गातो कबीर दोहे ॥धृ०॥

गगनात हांसती या, स्वप्नील मंद तारा
वेलीवरि सुखाने निजला दमून वारा
कालिंदीच्या तीरी या जल संथ संथ वाहे ॥१॥

भरला स्वरांत त्याच्या भक्तीतला सुगंध
ओठात आगळाच आनंद काही धुंद
त्याच्या समोर पुढती साक्षात देव आहे ॥२॥

काहूर अंतरीचे भजनांत लोप होई
भक्तीत श्रीहरीच्या मन हे रमून जाई
उघडून लोचनांना तो दिव्य रुप पाहे ॥३॥

• • •

# केशवा माधवा

संगीत - दशरथ पुजारी

गीत - रमेश अणावकर

केशवा, माधवा तुझ्या नामांत रे गोडवा ।।धृ०।।

तुझ्या सारखा तूंच देवा तुला कुणाचा नाही हेवा
वेळोवेळी संकटातुनी, तारीसी मानवा ।।१।।

वेडा होऊनी भक्तिसाठी गोपा गड्यांसह यमुनाकाठी
नंदाघरच्या गायी हाकिसी, गोकुळी यादवा ।।२।।

वीर धनुर्धर पार्थासाठी चक्र सुदर्शन घेऊनी हाती
रथ हाकुनिया पांडवांचा, पळविशी कौरवा ।।३।।

• • •

# या मीरेचे भाग्य उजळले

संगीत - दशरथ पुजारी

गीत - आत्माराम सावंत

या मीरेचे भाग्य उजळले
गिरिधर माझ्या स्वप्नी आले ।।धृ०।।
आळवीत मी होते भजनी
देखियले नव्हते नयनांनी
आज मला ते सौख्य लाभले
गिरिधर माझ्या स्वप्नी आले ।।१।।
व्यथा मनाची आता सरली
जननिंदेची भीती नुरली
भवसागर मी तरले तरले
गिरिधर माझ्या स्वप्नी आले ।।२।।
मीरे संगे नाचे मोहन
तालही धरिती पायी पैंजण
रात संपलीं केव्हा नकळे
गिरिधर माझ्या स्वप्नी आले ।।३।।

• • •

# अजाण आम्ही तुझी लेकरे

संगीत - कमलाकर भागवत

गीत - संजीवनी मराठे

अजाण आम्ही तुझी लेकरे, तूं सर्वांचा पिता
नेमाने तुज नमितो गातो, तुझ्या गुणांच्या कथा ॥धृ०॥

सूर्य चंद्र हे तुझेच देवा, तुझी गुरे वासरे
तुझीच शेते, सागर, डोंगरे, फुले, फळे पाखरे
अजाण आम्ही तुझी लेकरे ॥१॥

अनेक नांवे तुला, तुझे रे दाही दिशांना घर
करिसी देवा सारखीच तूं, माया सगळ्यांवर
अजाण आम्ही तुझी लेकरे ॥२॥

खुप शिकावे काम करावे, प्रेम धरावे मनी
हौस एवढी पुरवी देवा, हीच एक मागणी
अजाण आम्ही तुझी लेकरे ॥३॥

• • •

# चक्रवाक पक्षी वियोगे

संगीत - कमलाकर भागवत

अभंग - संत नामदेव

चक्रवाक पक्षी वियोगे बहाती
झाले मजप्रति तैसे आता ।।धृ०।।

चुकलीया माय बालके रडती
झाले मजप्रति तैसे आता ।।१।।

वत्स न देखता गाई हंबरती
झाले मजप्रति तैसे आता ।।२।।

जीवना वेगळे मत्स्य तळमळती
झाले मजप्रति तैसे आता ।।३।।

नामा म्हणे मज ऐसे वाटे चित्ती
करितसे खंती फार तुझी ।।४।।

• • •

# नाम आहे आदि-अंती

संगीत - कमलाकर भागवत

गीत - अशोकजी परांजपे

नाम आहे आदि-अंती नाम सर्व सार
आहे बुडत्याला नौका जीवनी आधार ।।धृ०।।

नामे तरीले पतीत तरीले पाषाण
नामे कोळियासी दिधले मुनीपद जाण
नामे जाळी संचिताचा पूर्ण बडीवार
आहे बुडत्याला नौका जीवनी आधार ।।१।।

नाममय झाला चोखा ब्रम्ही लीन झाला
अजामेळ पापराशी वैकुंठासी गेला
तेचिं उभे पंढरीसी घेऊनि आकार
आहे बुडत्याला नौका जीवनी आधार ।।२।।

नाम जपो वाचा नित्य श्वासांतही नाम
नाममय होवो देवा माझे नित्य कर्म
नामाच्याच संगे लाभो प्रेम रे अपार
आहे बुडत्याला नौका जीवनी आधार ।।३।।

• • •

# श्रीरामाचे चरण धरावे

संगीत - यशवंत देव

गीत - यशवंत देव

श्रीरामाचे चरण धरावे
दर्शनामात्रे पावन व्हावे ।।धृ०।।

सती अहिल्या दगडामाजी
शापित होऊनी युग युग मोजी
परी प्रभूच्या पदस्पर्शाने
पाषाणसही जीवन आले ।।१।।

उष्टी बोरे अर्पुनी प्रभूला
शबरीने जणु ठाव पाहिला
स्वीकारूनी ती रघुरायाने
देवपणाचे बिरुद राखिले ।।२।।

वनवासातच जीवन सरले
रामायणही तिथेच घडले
अयोध्येस प्रभू परतुनी येता
प्रेमाश्रुंनी नगर भिजावे ।।३।।

• • •

# भावगीते

# या लाडक्या मुलांनो

संगीत - दशरथ पुजारी

गीत - मधुकर जोशी

या लाडक्या मुलांनो, तुम्ही मला आधार
नव हिंदवी युगाचे तुम्हीच शिल्पकार ।।धृ०।।

आईस देव माना वंदा गुरूजनांना
जगी भावनेहुनी या कर्तव्य थोर जाणा
गंगेपरी पवित्र ठेवा मनी विचार ।।१।।

शिवबापरी जगात दिलदार शूर व्हावे
टिळकापरी सदैव ध्येयास त्या पुजावे
जे चांगले जगी या त्याचा करा स्वीकार ।।२।।

शाळेत रोज जाता ते ज्ञानबिंदू मिळवा
हृदयात आपुल्या त्या देशाभिमान ठेवा
कुलशील ध्यान राखा ठेवू नका विकार ।।३।।

• • •

# सहज तुला गुपित एक

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

सहज तुला गुपित एक सांगते दुपारी
डोळियात आली गडे प्रीत माझी लाजरी ।।धृ०।।

बैसते ओटीवरी नजर वळे अंगणी
अंगणात बहरते रानजाई देखणी
जाई खाली उभा असे हांसरा शिकारी ।।१।।

सांजवेळी गोठ्यातली गाय लागे हंबरु
सोडते ग धारेसाठी ओढ घेई वासरु
गोठ्यामधें दिसे सखे, सावळा मुरारी ।।२।।

पहाटेला ओठावरी गीत एक जागले
अंतरात कोणसे हळूच बाई बोलले
ओढाळले मन नेई माझिया सासरी ।।३।।

• • •

# पिवळी पिवळी हळद

संगीत - वसंत प्रभू

गीत - मधुकर जोशी

पिवळी पिवळी हळद लागली भरला हिरवा चुडा
वधू लाजरी झालीस तु ग सांगे तो चौघडा ॥धृ०॥

बाजुबंद त्या गोठपाटल्या बिलवर नक्षीदार
तुझ्या हृदयी ग कुणी छोडिली रति-वीणेची तार
सांग कुणी ग अंगठीस या दिधला तांबूस खडा ॥१॥

मुंडावळी या भाळी दिसती, काजळ नयनांतुनी
करकमळावरि कुणी गुंफिले सुवासिनींचे मणी
आठवणींचा घेऊन जा तूं माहेराचा घडा ॥२॥

स्वप्न फुलांसह फुलत राहा तू प्रेमळ संसारी
भाग्यवेल ती मोहरेल ग उद्या तुझ्या दारी
सौख्य पाहाता भिजू दे माझ्या डोळ्यांच्या या कडा ॥३॥

• • •

# प्रीत सागरी तुझ्या स्मृतीचे

संगीत - दशरथ पुजारी

गीत - पी. सावळाराम

प्रीत सागरी तुझ्या स्मृतीचे
गर्जत आले वारे वादळ ।।धृ०।।

फिरु लागले जग वाटोळे
सुन्न मनाने मिटले डोळे
रात निराशा ओकित काजळ ।।१।।

भग्न मनोरथ फुटला मचवा
हात कुणी द्या मला वाचवा
गिळे सागरी अश्रु ओघळ ।।२।।

तुफान झुंजत दीप मनोरा
अढळ उभारी किरण पसारा
पिंजून लाटा झरे प्रभावळ ।।३।।

• • •

# नाविका रे, वारा वाहे रे

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

नाविका रे वारा वाहे रे
डौलाने हाक जरा आज नांव रे
सांज वेळ झाली आता पैल माझे गांव रे ।।धृ०।।

आषाढाचे दिस गेले, श्रावणाचा मास सरे,
भादवा आला,
माझा राऊ मनामंदी बोलुनी गेला
धाव घेई बघ मन माझे, नाही त्याला ठाव रे ।।१।।

नवा साज ल्यायिले मी गौरीवाणी सजले,
चांदवा ल्याला
माझा जीवु उरामंदी फुलुनि आला
नांचते रे बघ तन माझे संगे त्याच्या धाव रे ।।२।।

• • •

# वाट इथे स्वप्नातील

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

वाट इथे स्वप्नातील संपली जणू
थांबवितो धारांनी सांवळा घनु ग बाई ।।धृ०।।

आजुबाजुच्या पानांनी वेढली ही निळाई
चिंतनात बैसली ग मंत्रमुग्ध राई
फुलुनिया आली गडे बावरी तनु ।।१।।

दऱ्यातुनि आनंदला पाणओघ नाचरा
आसमंत भारितो ग गान सूर हांसरा
माथ्यावरी दिसले ग इंद्राचे धनु ।।२।।

• • •

# असावे घर ते आपुले छान

संगीत - दशरथ पुजारी

गीत - पी. सावळाराम

असावे घर ते आपुले छान ।।धृ०।।

पुढे असावा बागबगीचा
वेल मंडपी जाईजुईचा
आम्रतरुवर मधुमासाचा फुलावा मोहर पानोपान ।।१।।

संगमरवरी ती पुष्करणी
त्यात असावे गुलाबपाणी
पाण्यामधुनी कारंजाची फुटावी सुरेल सुंदर तान ।।२।।

फुलासारखे मूल असावे
नित्य चांदणे घरी हंसावे
तीर्थरुप ओवाळावे आपुले जीवन पंचप्राण ।।३।।

• • •

# पांखरा जा

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

पांखरा जा ऽ ऽ ऽ ऽ दूर देशी
सांग माझा निरोप माझ्या साजणां ।।धृ०।।

चैत्राचे चांदणे मला आज बोलवे
बोलण्यात त्याचिया भान पार मालवे
मी आज एकली साथ ना कुणाची
म्हणुनीच लाडक्या जा सांग ना ।।१।।

मैनेचे बोलणे मला आज आठवे
आठवांत होई ग मन फार हळवे
प्रीत आज हांसली साथ ना मनाची
म्हणुनीच लाडक्या जा सांग ना ।।२।।

• • •

# नकळत सारे घडले

संगीत - दशरथ पुजारी

गीत - रमेश अणावकर

नकळत सारे घडले, मी वळता पाऊल अडले ॥धृ०॥

ती पहिली क्षण ओझरती परिचयात ओळख नुसती
संभाषण ओठावरती लाजण्यात राहुन गेले ॥१॥

नजरेला नजरेमधला हंसताना भाव उमगला
प्रीतीचा डाव हि पहिला मी क्षणात मोहुन गेले ॥२॥

सोन्याहुन अतिमोलाचे हे माझे गुपित मनीचे
मनी सुगंध उधळित नाचे क्षण मलाच कांही न कळले ॥३॥

• • •

काव्य
क्र. २६२६
२६५७०

# ते नयन बोलले कांहीतरी

संगीत - दशरथ पुजारी

गीत - रमेश अणावकर

ते नयन बोलले कांहीतरी
मी खुळी हांसले खुळ्यापरी ॥धृ०॥

निळ्या नभापरी किंचित निळसर
नयन बोलले आणिक सुंदर
बघता बघता मीहि क्षणभर, झाले ग बावरी ॥१॥

क्षण माझे मलाच न कळे
वसंत नयनी कधी दरवळे
तनु कोमल या वेलीवरले, फुल फुले अंतरी ॥२॥

मला हवे जे अती मोहक ते
कसे अचानक जुळुनी येते
सांगाया मज लाज वाटते, संभ्रमात मी क्षणभरी ॥३॥

• • •

# हसण्याचे बहुमोल उमगते

संगीत - दशरथ पुजारी

गीत - रमेश अणावकर

हसण्याचे बहुमोल उमगते
आसू ढळताना
खऱ्या मनाची जाणीव होते
उणीव असताना ।।धृ०।।

अंधारातून स्वप्न रंगते
ज्योत दिव्याची जेव्हा विझते ... २
भाव त्यातले प्रीत जाणते ... २
विरही झुरताना ।।१।। ... २

उजेडात ह्या दोन आकृती
उन सावली मागे पुढती
छायेसाठी जीव तळमळे ... २
उन्हात फिरताना ।।२।।

जीवनात या समतोलाची
दोन दालने सुखदु:खाची
परस्परांची जाणीव देती
जीवन जगताना ।।३।।

हसण्याचे बहुमोल उमगते
आसू ढळताना

• • •

# रे क्षणांच्या संगतीने

संगीत - दशरथ पुजारी

गीत - राम मोरे

रे क्षणांच्या संगतीने भारावले
वेड वेड घेऊनी मी, मागुनी तव धावले ।।धृ०।।

ध्यास लागे सारखा आभास होती या जीवा
अंतरी तुजला स्मरावे छंद लागे हा नवा
या जगाच्या निंदकांचे मी हलाहल प्राशिले ।।१।।

संपदा लागो करि वा दैन्य कोरांटी परी
तृप्त मी होईन नाथा दो करांच्या कोटरी
आवरिता आवरेना झिंगलेली पाऊले ।।२।।

ना भीती जननीतीची मज तूं उभा मागे पुढे
रे नको मज स्वर्ग जेथे लाभ देवाचा घडे
तारी आता तूंच माझ्या देही भिनली वादळे ।।३।।

• • •

# मृदुल करांनी छेडित तारा

संगीत - दशरथ पुजारी

गीत - रमेश अणावकर

मृदुल करांनी छेडित तारा
स्मरते रुप हरीचे मीरा ।।धृ०।।

कमलदलापरि मिटल्या अधरी
नाम मनोहर खुलता श्रीहरी
हर्षभराने तनुलतिकेवरि पडती अमृत धारा ।।१।।

कालिंदीच्या नील जलापरि
हृदयी वाहे भक्ति हंसरी
तन्मयतेच्या कुंजवनी तीरी, फुलवी प्रीत फुलोरा ।।२।।

सालस भोळी थोर मनाची
मीरा दासी प्रभू चरणांची
मिटल्या नयनी धुंद मनाची, रंगवी हंसरी मथुरा ।।३।।

• • •

# काल राती स्वप्नामध्ये

संगीत - अशोक पत्की

गीत - शांताराम नांदगावकर

काल राती स्वप्नामध्ये
एक राजा आला
मज मोहुन गेला
नवतीच्या त्या प्रीतीसाठी
जीव ही माझा भारला ।।धृ०।।

वेलीस गंध गंधात मंद
धुंदावली फुले
स्पर्शात रंग रंगात दंग
ही केतकी झुले
नाजुक तारा, गोरा मोरा
नील आकाशी जागला ।।१।।

प्रीतीत गीत गीतात मीत
ना पापणी हले
भीती मनात मी त्या क्षणात

त्याचीच जाहले
लाज अबोली, गाली आली
प्रीत फुलोरा हासला ॥२॥

• • •

# दिन रात तुला मी किती स्मरु

संगीत - वसंत प्रभू

गीत - रमेश अणावकर

दिन रात तुला मी कशी स्मरु
जन हंसती मला मी काय करु ? ।।धृ०।।

भरल्या नयनी हात जोडुनी
सांगु कुणाला काय म्हणोनी
काहुर मनी ते येता दाटुनी
माझी मला मी कशी सावरुं ? ।।१।।

कितीकदा मज पाहुनी कष्टी
जे येती ते वेडी म्हणती
मुग्धकळी परी मिटल्या ओठी
ध्यानी मनी मी अशी किती झुरु ? ।।२।।

निराधार मी धुळीस मिळुनी
गेले वेढुनी चहु बाजुंनी
खिन्न जगी या बंदीवान मी
तुला नव्हे तर कुणा विचारु ? ।।३।।

# लाजवी मला हे नांव गडे

संगीत - वसंत प्रभू | गीत - रमेश अणावकर

लाजवी मला हे नांव गडे
अन् नयनी मनोहर रुप दडे ।।धृ०।।

नजरानजरी हंसण्यामधली
क्षण ओळख ती क्षणांत जडली
प्रीत सुगंधित गाली कोवळी
आली उधळीत गंध सडे ।।१।।

अवखळ माझे डोळे दोन्ही
लाजू नको ग म्हणती हंसुनी
भाव मनीचे हसरे बघुनी
हसू कां रुसू? प्रश्न पडे ।।२।।

जगताहुन ही अगदी निराळी
धुंद मनाची प्रीत आगळी
ठरल्या जागी ठरल्या वेळी
पाऊल माझे अचुक पडे ।।३।।

• • •

# आंस आहे अंतरी या

संगीत - दशरथ पुजारी

गीत - मधुकर जोशी

आंस आहे अंतरी या आसरा हृदयांत दे
साद देते मी तुला अन् तू मला पडसाद दे ।।धृ०।।

जुळविता तारा मनीच्या जुळविली आम्ही मने
प्रेमगीतांना प्रिया तू आगळे संगीत दे ।।१।।

सांग वेडे हृदय माझे ओढ घेई तुजकडे
विरह जो अंगार आहे गारवा तू त्यास दे ।।२।।

प्रीतीचे दोघे प्रवासी मार्गी येथे भेटलो
यौवनाच्या मंदिरी या चांदण्याचा स्पर्श दे ।।३।।

• • •

# उतरली सांज ही धरेवरी

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - सूर्यकांत खांडेकर

उतरली सांज ही धरेवरी
मी उभी घेऊनी कलश करी ॥धृ०॥
चांद मनी दरवळे मनोहर
नाचत रंगत जल लहरीवर
तरीच व्याकूळ माझे अंतर
मज साद घालतो खरोखरी ॥१॥
पूरे शांतता या पथी निर्जन
प्रेम नदीला भरते येऊन
उठती लहरी चंचल उधळून
ही वळती पाऊले कशावरी ॥२॥
येईल का ही मीरा परतुन
मोह नदीला भरती येऊन
तिथेच कोणा राहील बिलगुन
वेणु वाजवी विसरी मोहन
तो नाद अनोखा घुमे उरी ॥३॥

• • •

# या गडे हांसू या, या गडे नाचू या

संगीत - वसंत प्रभू

गीत - संजीवनी मराठे

या गडे हासू या, या गडे नाचू या
गाऊ या मंगलगान, गाऊ या मंगलगान ।।धृ०।।

खेळू या फुगडी धरुनिया फेर
रचु या आरास चौरंगी चौफेर
देऊ या घेऊ या प्रेमाचा आहेर
मिळुनी थोर लहान ।।१।।

आपुली धरती आपुले आकाश
आपुला सागर आपुला प्रकाश
सुनील नभात गुंजते त्यात
खगांची स्वच्छंद तान ।।२।।

वादळांचे वारे घोंगावे जगांत
शांतीचे चांदणे माझ्या माहेरांत
मावेना आनंद दृष्टीत देहांत
वाटते हरपे भान ।।३।।

• • •

# सकल मिळुनी हसुनी

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - संजीवनी मराठे

सकल मिळुनी हसुनी खुलुनी गोफ गुंफु या ग
पदर पदर स्वकरी धरुनी नाच नाचु या ग ॥धृ०॥

नाचताती पवन फुले डुलती सुमपराग खुळे
चलचरणी त्यास खुडूनी आजि आणु या ग ॥१॥

वर्ष वर्षतात मेघ जलधारा झरति सुभग
लपत छपत स्वकरी अमित त्यासि वेचु या ग ॥२॥

मधुर गान गाऊनिया प्रेमरंगी रंगुनिया
गोफ विणुनि सृजन चरणी आज वाहु या ग ॥३॥

• • •

# या कळ्यांनो या फुलांनो

संगीत - दशरथ पुजारी

गीत - मधुकर जोशी

या कळ्यांनो या फुलांना या जरा
मंत्र वंदे मातरम् हा घोष गर्जा अंबरा ॥धृ०॥

आणिले स्वातंत्र्य आम्ही झुंजुनि शत्रुसवें
हाती तुमच्या देतसे ते शुभ नव्या भाग्यासवें
रक्षणे स्वातंत्र्य आता कार्य हे इतके करा ॥१॥

राहु द्या बंदुक तुमची सज्ज त्या शत्रुवरी
लक्ष असु द्या आईसम या थोर शेतीवरी
मातीतून या मोती पिकवा येऊ द्या लक्ष्मी घरा ॥२॥

शिवप्रभूंचा लाभला हा आज आम्हा वारसा
टिळक, गांधी शास्त्री आहेत जीवनाचा आरसा
नेहरु अन् इंदिरा ही सांगती या सागरा ॥३॥

• • •

# या झोपल्या जगात

संगीत - दशरथ पुजारी

गीत - राम मोरे

या झोपल्या जगांत नाही कुणीच जागे
बिलगुनिया धरेला आकाश गूज सांगे ।।धृ०।।

माळून हार डोई रानातल्या फुलांचा
ल्याली वसुंधरा ही अभिसार चांदण्याचा
मधुवंतिचा सुवास वाऱ्यावरी तरंगे ।।१।।

स्वप्नील लोचनांत झुकतो हळूच चांद
देहातुनी सुरेल घुमला मधुर नाद
नि:शब्द रात्र जाई गुंफीत प्रीत धागे ।।२।।

आली फुलून काया कंपित गात्र झाले
बेबंद असलेले मन मेघ मेघ झाले
होती भल्या पहाटे ती एकरुप दोघे ।।३।।

• • •

# पाण्यातली परी मी

संगीत - दशरथ पुजारी

गीत - वसंत निनावे

पाण्यातली परी मी, पाण्यातली परी मी
माझ्या मनातला मज लाभेल काय स्वामी ॥धृ०॥

घे शोध राजहंसा माझ्या जरा प्रियाचा
तुझिया परि तयाचा तो डौल चालण्याचा
तुझियापुढे झुके नभ जाई नमून भूमी ॥१॥

त्याचे विशाल डोळे कमळा तुझ्याप्रमाणे
माझीच दिवस रात्री ते पाहतात स्वप्ने
तुझिया परि बरंगा मज आवरे न उर्मी ॥२॥

नगरीस मम प्रियाच्या घेऊन जाई नौके
मज शैशवातुनी तू दे यौवनात झोके
ये जवळ ये किनाऱ्या होईन तव ऋणी मी ॥३॥

• • •

# दीपका मांडिले तुला

| संगीत कमलाकर भागवत | गीत - बा.भ. बोरकर |
|---|---|

दीपका मांडिले तुला सोनियाचे ताट
जडविला घडविला चंदनाचा पाट ।।धृ०।।

घातली ताईने तुला रंगाची रांगोळी
पित्याने रेखिल्या गोड भविष्याच्या ओळी
घाशिली समई ही केली तेलवात
दह्यात कालविला हा जिरेसाळ भात ।।१।।

गा रे राघु, गा ग मैने, गाण्याच्या या ओळी
मुखी तुमच्याही घालू दुधातली पोळी
कुत्तु, माऊ, चिऊ, काऊ या सारे या रे
सांडलेली शिते गोड उचलून घ्या रे ।।२।।

गुणी माझा बाळ कसा मटामटा जेवी
आयुष्याने थोर करी आई कुलदेवी
घरदार प्रकाशाने भरी काठोकाठ
दारी आलेल्यांची करु सोपी पायवाट ।।३।।

• • •

# आली बघ गाई गाई

संगीत - कमलाकर भागवत

गीत - इंदिरा संत

आली बघ गाई गाई
शेजारच्या अंगणात
फुललासे निशिगंध
घोटाळली ताटव्यात ॥धृ०॥

आली बघ गाई गाई
चांदण्यांचे पायी चाळ
लाविले का अवधान
ऐकावया त्यांचा ताल ॥१॥

आली बघ गाई गाई
लावी करांगुली गाली
म्हणुन का हसलीस
उमटली गोड खळी ॥२॥

आली बघ गाई गाई
लोचनांचे घेई पापे
म्हणून कां भारावले
डोळे माझे लाडकीचे ॥३॥

आली बघ गाई गाई
काढीतसे लांब झोका
खेळूनिया दमलीस
मीट मोतियांच्या शिंपा ॥४॥

• • •

# उठा उठा चिऊताई

संगीत - कमलाकर भागवत

गीत - कुसुमाग्रज

उठा उठा चिऊताई
सारीकडे उजाडले
डोळे तरी मिटलेले
अजुनही अजुनही ।।धृ०।।

सोनेरी हे दूत आले
घरट्याच्या दारापाशी
डोळ्यावर झोप कशी
अजुनही अजुनही ।।१।।

लगबग पांखरे ही
गात गात गोड गाणे
टिपतात बघा दाणे
चोहिकडे चोहिकडे ।।२।।

झोपलेल्या अशा तुम्ही
आणायाचे मग कोणी
बाळासाठी चारापाणी
चिमुकल्या चिमुकल्या ॥३॥

बाळाचे मी घेता नांव
जागी झाली चिऊताई
उडोनिया दूर जाई
भूर भूर भूर भूर ॥४॥

• • •

# चंद्राचे चांदणे जणु

संगीत - सुमन कल्याणपूर

गीत - वसंत निनावे

चंद्राचे चांदणे जणु ही
सूर्यासम मानुनी
प्रिय साऱ्याचे करावयाला
आली प्रियदर्शिनी ।।धृ०।।
वारसा लाभला हिमालयाहुन थोर
आरसा असे सत्याचा नित्य समोर
काट्यावरुनी हसत निघाली
आज फुलांच्या वनी ।।१।।
अंधार प्यावया झाली ही अंगार
जाहली तुषार्तासाठी ही जलधार
फुले धरित्री गात्री गात्री
येता मंदाकिनी ।।२।।
भगवती इंदिरा जिथे जिथे ही जाई
उगवती मंदिरे अवचित त्या त्या ठायी
सौंधावर ही उभी नभाच्या
आहे सौदामिनी ।।३।।

• • •

# वल्हव वल्हव रे होडी

संगीत - अशोक पत्की | गीत - रमेश अणावकर

वल्हव वल्हव रे होडी
पल्याड माझं गाव रे
आज रात पुनवेची
हो गाणं गात नाचायची
आली भरती समिंदरा ।।धृ०।।
चारी दिशा रंगलेल्यां
आभाळ हे निळं निळं
चांदण्यांच्या मेळाव्यात
चांद राजा आज खुलं
लाटांसवे ताल धरी, शिडामंदी वारा
वाऱ्यासंगे मन जाई, मन माझं माहेरा ।।१।।
घर माझं सोन्यावानी
नाही मला कांही कमी
भाग्य माझं साधं भोळं
आज अमृतात न्हालं
देवाजीची किरपा झाली, आयली लक्ष्मी घरा
सर्व सुखी आनंदाचा, तूच रे निवारा ।।२।।

• • •

# एकदाच यावे सखया

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

एकदाच यावे सखया, तुझे गीत कानी
धुंद होऊनी मी गावे धुंद त्या सुरांनी ।।धृ०।।

असा चंद्र कलता राती रानगंध यावा
सर्वभान विसरुनी नाती स्पर्श तुझा व्हावा
पुन्हा गुज अंतरिचे हे कथावे व्यथांनी
धुंद होऊनि मी जावे धुंद त्या सुरांनी ।।१।।

एकदाच वाटेवर या तुला मी पहावा
भावदग्ध विटला हा रे पुन्हा फुलुनी यावा
स्वप्न हेच हृदयी धरिले खुळ्या आठवांनी
धुंद होऊनि मी जावे धुंद त्या स्वरांनी ।।२।।

असा शांत असता वारा, रानपक्षी गावा
शब्दरुप प्रतिमा बघुनि जीव विरुनि जावा
एकदाच यावे सखया तुझे गीत कानी
धुंद होऊनी मी जावे धुंद त्या सुरानी ।।३।।

• • •

# शब्द शब्द जपुनि ठेव

संगीत - विश्वनाथ मोरे

गीत - मंगेश पाडगांवकर

शब्द शब्द जपुन ठेव
बकुळिच्या फुलापरि ॥धृ०॥

काय बोलले नकळे
तू समजुन घे सगळे
लाविलीस ज्योत तूंच
या उदास अंतरी ॥१॥

दुःख नको तुटतांना
अश्रु नको ढळताना
मी मिटता लोचन हे
उमलशील तूं उरी ॥२॥

साक्ष लाख ताऱ्यांची
स्तब्ध अचल वाऱ्याची
ज्योत बनुन जळले रे
मी तुझ्या पथावरी ॥३॥

• • •

# मी बोलले न कांही

संगीत - विश्वनाथ मोरे

गीत - मंगेश पाडगांवकर

मी बोलले न कांही नुसतेच पाहिले
हृदयांत दाटलेले हृदयांत राहिले ।।धृ०।।
परतुन हाय जाण्या ओठात शब्द आले
डोळ्यातले इषारे डोळ्यात कैद झाले
मी मंद पापण्यांनी हे सर्व साहिले
हृदयांत दाटलेले हृदयांत राहिले ।।१।।
देऊन सर्व कांही नाही दिलेच कांही
ज्याला हवे कळाया कळलेहि त्यास नाही
माझ्याच अंतरी मी हे फुल वाहिले
हृदयांत दाटलेले हृदयांत राहिले ।।२।।
निःशब्द आसवांनी उमजाविले मनाला
की शाप वेदनेचा प्रितीस लाभलेला
माझ्याच मी मनाशी हे गीत गायिले
हृदयांत दाटलेले हृदयांत राहिले ।।३।।

• • •

# तुला ते आठवेल कां सारे

संगीत - विश्वनाथ मोरे

गीत - मंगेश पाडगांवकर

तुला ते आठवेल कां सारे
दवांत भिजल्या जुईपरी हे मन हळवे झाले रे ॥धृ०॥

तुझ्या करांतील मोरपीस ते
अजून गालावरुनी फिरते
बनातुनी केतकीच्या येता सुगंध शिंपींत वारे ॥१॥

त्या तरु वेली तो सुम परिमळ
झऱ्यांतली चांदीची झुळझुळ
आठवणींच्या चिंचा गाभुळ रुचतील काय तुला रे ॥२॥

ते सारे मी हृदयी जपते
उगीच लाजते उगीच हंसते
हृदयामधल्या देवासाठी हवेत का देव्हारे ॥३॥

• • •

# ते हात असे जुळलेले

संगीत - विश्वनाथ मोरे | गीत - मंगेश पाडगांवकर

ते हात असे जुळलेले
हे नेत्र असे खिळलेले
विसरशील तूं सारें
विसरशील तूं सारें ॥धृ०॥

हे सांध्यरंग विरतील
तारका नभीं झुरतील
हे उदास होतील सारें
विसरशील तूं सारें ॥१॥

मधुगंध धुंद उडतांना
तिमिरांत चंद्र बुडतांना
मी स्मरेन सर्व इषारे
विसरशील तूं सारें ॥२॥

तूं जिथें कुठें असशील
स्वप्नांत मला दिसशील
तुज कळले पण हें का रे?
विसरशील तूं सारें ।।३।।

• • •

# रिमझिम झरती श्रावणधारा

संगीत - दशरथ पुजारी

गीत - मधुकर जोशी

रिमझिम झरती श्रावणधारा
धरतीच्या कलशात
प्रियाविण उदास वाटे रात ।।धृ०।।

बरस बरस तूं मेघा रिमझिम
आज यायचे माझे प्रियतम
आतुरलेले लोचन माझे
बघती अंधारात
प्रियाविण उदास वाटे रात ।।१।।

प्रासादी या जिवलग येता
आ ऽ ऽ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ
प्रासादी या जिवलग येता
कमळ मिठी मध्ये भृंग भेटता
बरस असा की प्रिया न जाईल
माघारी दारात
प्रियाविण उदास वाटे रात ।।२।।

मेघा असती तूं आकाशी
वर्षातुन तूं कधी वर्षसी
वर्षामागुन वर्षती नयने
बरसे नित बरसात
प्रियविण उदास वाटे रात ॥३॥

• • •

# आले मनात माझ्या

संगीत - अशोक पत्की

गीत - रमेश अणावकर

आले मनात माझ्या
खुलली क्षणात आशा
सांगावया नको ते
तू जाणलीस भाषा ।।धृ०।।
या मूक भाषणाचा
भावार्थ सर्व साधा
माझी मलाच ज्याची
जडली अमोल बाधा
बाधेत भावनेची
प्रणयात होई वर्षा ।।१।।
माझ्या मनातले हे
नवनीत स्वप्न भोळे
प्रीतीस जाग येता
साकार आज झाले
अधरी हसून बोले
ही गोड हास्य रेषा ।।२।।

# पैंजण रुमझुमले

संगीत - दशरथ पुजारी

गीत- बजरंग सरोदे

पैंजण रुमझुमले पाऊल राधेचे पडले ।।धृ०।।

रात्र वादळी दिशा लोपल्या
सर्व चराचर निशा झोपल्या
काळिज डुचमळले ।।१।।

उंबरठ्यावर चाहूल आली
सुगंध उधळीत प्रीत लाजली
मानस परिमळले ।।२।।

लाजत मुरडत येई जवळी
साहस करुनी अशा अवेळी
प्रेम असे कळले ।।३।।

• • •

# वाऱ्यावरती घेत लकेरी

संगीत - दशरथ पुजारी | गीत - रमेश अणावकर

वाऱ्यावरती घेत लकेरी
गात चालल्या जललहरी ।।धृ०।।

चहु दिशांनी प्रेम रसांकित
लकेर घुमवी सुरेल संगीत
अन् संध्येच्या गाली नकळत
स्वप्न् रंगती निलांबरी ।।१।।

ताल धरोनि हरित तृणांचे
मोहक पाते मुरडत नाचे
फूल होऊनि कुंदकळीचे
गंध उधळिते मोदभरी ।।२।।

भेदभाव हे विसरून सगळे
आनंदाने गायियलेले
सप्तसुरांचे गीत रंगले
सात वेगळ्या सरोवरी ।।३।।

• • •

# जुळल्या सुरेल तारा

संगीत - दशरथ पुजारी

गीत - श्रीकांत पुरोहित

जुळल्या सुरेल तारा स्मरते अजुन नाते
डोळ्यात भाव माझे गाती तुझीच गीते ।।ध्रु०।।

स्वप्नापरी अजुन ते दिवस भासतात
छळती उजाड राती हळुवार गीत गात
तो काळ आठवीता नयनांत नीर दाटे ।।१।।

फिरलो मिळून दोघे गुंफून हात हाती
फुलले गुलाब गाली स्पर्शुनि धुंद प्रीती
त्या कोवळ्या मनाला वरदान दिव्य होते ।।२।।

शब्दात रंगविले मी भाव - स्वप्न भोळे
त्या भावड्या कळीला गीतात अर्घ्य देते
डोळ्यात भाव माझे गाती तुझीच गीते ।।३।।

• • •

# रात्र आहे पौर्णिमेची

संगीत - दशरथ पुजारी

गीत - शांताराम नांदगांवकर

रात्र आहे पौर्णिमेची, तू जरा येऊन जा
जाणिवा थकल्या जिवाच्या एकदा ऐकून जा ॥धृ०॥

निथळला तो भाव सारा, वितळल्या चंद्रातुनी
मिसळल्या मृदु भावनाही, झोपल्या पानातुनी
जागती नेत्रातली ही, पांखरे पाहून जा ॥१॥

पांखरे पाहून जा, जी वाढती पंखाविना
सूर कंठातील त्यांच्या, जाहला आता जुना
त्या पुराण्या गीतिकेचा, अर्थ तू ऐकून जा ॥२॥

अर्थ तूं ऐकून जा, फुलवील जो वैराण ही
रंग तो पाहून जा, जो तोषवी अंधास ही
ओंजळीच्या पाकळ्यांचा स्पर्श तू देऊन जा ॥३॥

• • •

# बोलून प्रेम बोल

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - गंगाधर महांबरे

बोलून प्रेम बोल तू लाविलास छंद
लावून छंद वेडा केलेस विश्व धुंद ।।धृ०।।

धुंदीत त्या क्षणाच्या युग एक हे बुडाले
घरटे करोनि चिमणे मन पाखरु उडाले
वाऱ्यावरी वरात पथ हा तया अरुंद ।।१।।

प्रीतीत रंगलेली विरही उषा प्रभाती
छंदात हरवल्या त्या मधुपुनव चांदराती
निशिगंध मात्र देई मन भावडा सुगंध ।।२।।

• • •

# अरुण उगवला

संगीत - दशरथ पुजारी

गीत - पी. सावळाराम

अरुण उगवला अनुरागाचा
उजळत आभाळी
उषा प्रीतीची हासत लावी
कुंकुम मंगल भाळी ।।धृ०।।
नेत्र कमळीचा भ्रमर उडाला
मरंद उधळीत
फुलू लागला हर्ष सुगंधी
पुष्प पाकळीत
घेत भरारी जीव - पांखरे
आळवित भुपाळी ।।१।।
स्वर्ग सुखाचा आज मोहरे
कल्पतरु दारी
तुळस मंजिरी डोलू लागली
रामाच्या प्रहरी
जोडूनि कर ते प्रीत सुवासीण
प्रदक्षिणा घाली ।।२।।

• • •

# मी चंचल होऊन

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - मंगेश पाडगांवकर

मी चंचल होऊनि आले
भरतीच्या लाटांपरि उधळित
जीवन स्वैर निघाले ।।धृ०।।

फुलवुनि गात्री इंद्रधनुष्यें
क्षितिज विंधुनी धुंद कटाक्षे
विरघळलेले नवथर उन्मद
चंद्रकिरण मी प्याले ।।१।।

श्रावणाचिया अधरी लपुनी
रिमझिमणाऱ्या धारांमधुनी
पानांवरचे पुसुन आसू
उर्वशीच मी हसले ।।२।।

नजराणे घेऊन ऋतूंचे
हृदयांतिल गंधित हेतुंचे

आकाशाची प्रिया कधी मी
होऊनि लाजत सजले ॥३॥

जन्ममृत्यूचे लंघुनि कुंपण
स्थलकालाच्या अतीत उमलून
प्रवासिनी मी चिरकालाची
अनाघ्रात ही उरले ॥४॥

• • •

# उर्मिला, मी निरोप

संगीत - दशरथ पुजारी

गीत - रमेश अणावकर

उर्मिला, मी निरोप तुज देता
जाऊ नको तू वनी या क्षणी
सांगू कसे नाथा ॥धृ०॥
पितृवचनी रामामागुनी
चरण चालती निश्चय करुनी
बंधुप्रेम हे गहिवरुनिया
मीच स्वये पाहाता ॥१॥
रघुवंशातिल ज्या पुरुषाला
देव म्हणोनि मी पुजियला
वीर धनुर्धर त्या वीराची
असता पतिव्रता ॥२॥
मुग्ध मनाची वेडी माया
दु:ख झेलुनि झिजते काया
त्या झिजण्यातच शत जन्माचे
भाग्य मला लाभता ॥३॥

• • •

# मी नाही तू

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

मी नाही तूं, तूं नाही मी
कुठं कुणी ग लपायचं ?
लपाछपीचा खेळ चालला
अंगण नाही पुरायचं ग बाई ।।धृ०।।

लिंब दारीचा दूर राहातो
मामांचा सोपा लांब वाटतो
आता कसं ग पळायचं ।।१।।

बाबांच्या खोलीत मी नाही जायची
दादा नी वहिनी रागे भरायची
आता कुणाला सांगायचं ।।२।।

गच्ची वरती वाराच येतो
निरोप सासरचा सांगुन जातो
जमेल तरी का टाळायचं ।।३।।

• • •

# कुणीतरी पाही बाई

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

कुणीतरी पाही बाई चोरुनिया ग
मी थांबले ऽ ऽ ऽ ऽ
मी तर थांबले ग लाजूनिया ।।धृ०।।

श्रावणात मन ओले, प्राजक्ताचे फूल झाले
कुणीतरी घेइ बाई तोडूनिया ग ।।१।।

ओठी बघ गीत आले कंठात या मैना बोले
कुणीतरी साद देई गाऊनिया ग ।।२।।

जीवशीव लोभावले चराचर एक झाले
कुणीतरी सांगे बाई अंतरीया ग ।।३।।

• • •

# दारी पाऊस पडतो

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

दारी पाऊस पडतो, रानी पारवा भिजतो
आला आला ग सुगंध मातीचा
बघ पागोळ्या गळती थेंब अंगणी नाचती
आला आला ग सुंगध मातीचा ।।धृ०।।

श्रावणात सारे जीव झाले बाई ओले
ऊन हळदीचे पानापानातुन खेळे
उभी पिकेही डोलती बाळे झाडाची बोलती
आला आला ग सुगंध मातीचा ।।१।।

वसुंधरा आज नवरसात बुडाली
माळ बगळ्यांची बघ आकाशी उडाली
श्रियाळराजाचा सण चांगुणा मातेचा ।।२।।

नागपंचमीचा देव तो ग शोभला
कुणी गौरी ग पुजिती गोफ रेशमी विणती
आला आला ग सुगंध मातीचा ।।३।।

• • •

# आला गं बाई अंगणी

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

आला ग बाई अंगणी, अंगणी बाळराजा
माझा बाळराजा ।।धृ०।।

इवले इवले डोळे हासती ग भोळे
जावळ कुरळे बाळ खेळे
नाच ग मयुराचा ।।१।।

हनुवटी तीळ शोभतो वेल्हाळ
बोलती लडिवाळ बाळराजे
कंठ ग राघवाचा ।।२।।

गुलाबाचे फूल गोरे गोरे गाल
फुगविते मूल चैतन्याचे
कृष्ण ग गोकुळीचा ।।३।।

• • •

# घाल घाल पिंगा

संगीत- कमलाकर भागवत

गीत - कृ. ब. निकुंब

घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात
माहेरीच्या सुवासाची कर बरसात ।।धृ०।।

सुखी आहे पोर सांग आईच्या कानात
आई भाऊसाठी परी मन खंतावतं
विसरली कां ग भादव्यात वर्ष झालं
माहेरीच्या सुखाला ग मन आंचवले ।।१।।

फिरुन फिरुन सय येई जीव वेडावतो
चंद्रकलेचा ग शेव ओलाचिंब होतो
काळ्या कपिलेची नंदा खोडकर फार
हुंगहुंगुनिया करी किती ग बेजार ।।२।।

परसात पारिजातकाचा सडा पडे
कधी फुले वेचायाला नेशिल तू गडे

कपिलेच्या दुधावर मऊ दाट साय
माया माझ्यावरी दाट जशी तुझी माय ॥३॥

आले भरुन भरुन डोळे गळाही दाटला
माऊलीच्या भेटीसाठी जीव व्याकुळला
घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात
माहेरीच्या सुवासाची कर बरसात ॥४॥

• • •

# केतकीच्या बनी

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

केतकीच्या बनी तिथे नाचला ग मोर
गहिवरला मेघ नभी सोडला ग धीर ।।धृ०।।

पापणीत सांचले अंतरात रंगले
प्रेमगीत माझिया मना मनात धुंदले
ओठावरी भिजला ग आसावला सूर ।।१।।

डोळियात पाहिले कौमुदीत नाचले
स्वप्नरंग स्वप्नीच्या सुरासुरात थांबले
झाडावरी दिसला ग भारला चकोर ।।२।।

भावफूल रात्रीच्या अंतरंगी डोलले
धुक्यातुनी कुणी आज भावगीत बोलले
केतकीच्या बनी तिथे नाचला ग मोर
गहिवरला मेघ नभी सोडला ग धीर ।।३।।

• • •

# कुणी निंदावे

संगीत - अशोक पत्की | गीत - अशोकजी परांजपे

कुणी निंदावे कुणी वंदावे
फोल पसारा सारा रे
कृष्णरुप जग झाले आता
मी तर वेडी मीरा रे ।।धृ०।।

सदनी असो वनात किंवा
जळात राहो रणात अथवा
नामघोष तो एकच हृदयी
राधाधर हरि मिलिंद रे ।।१।।

वृंदावन जन गोकुळ गुणिजन
सेवा ध्यान तपोवन सारे
इच्छा एक मनात नांदे
हरिपावन मन जीवन रे ।।२।।

देहचि मंदिर आत्मा गिरिधर
नयन सरोवर तीर्थचि रे
मीरेचे प्रभू मोहन श्रीधर
पाप विनाशी नामचि रे ।।३।।

• • •

# पैलतिरी रानामाजी

संगीत - अशोक पत्की

गीत - अशोकजी परांजपे

पैलतिरी रानामाजी नको नको येऊ नको रे
प्रीत आहे माझी भोळी साद तिला घालू नको रे ||धृ०||

बालपण दूर गेले निघुनी श्रावणाचे स्वप्न आले
बांधावर कोणी आले शिवारा पाऊल ते कानी आले
ओलावल्या गीताला तूं सूर ओला देऊ नको रे ||१||

भारावले डोळे गेले मिटूनी भावनांचे सूर झाले
शोध घेती आज भाव किनारा ओठातही शब्द आले
गंधवेड्या शब्दांतूनी या अर्थ वेडा काढू नको रे ||२||

• • •

# चित्रपट गीते

# देवा दया तुझी की

संगीत - वसंत देसाई

गीत - ग. दि. माडगुळकर

देवा दया तुझी की
ही शुध्द दैवलीला
लागो न दृष्ट माझी
माझ्याच वैभवाला
देवा दया तुझी रे ।।धृ०।।

भाळावरी बसे या
निष्ठूर जी कुठार
घावातुनी उडावे
कैसे सुधा तुषार
निर्जीव जन्म माझा
त्या अमृतात न्हाला
लागो न दृष्ट माझी
माझ्याच वैभवाला
देवा दया तुझी रे ।।१।।

माझ्या मुलास लाभे
सुख छत्र रे पित्याचे

ही प्रीतीची कमाई
की भाग्य नेण त्याचे
उध्वस्त मांडवाचा
दारी वसंत आला
लागो न दृष्ट माझी
माझ्याच वैभवाला
देवा दया तुझी रे ।।२।।

सौख्यात नांदताना
कां दु:ख आठवावे
जे नामशेष झाले
ते काय साठवावे
हास्यात आजच्या ह्या
कळ कालची कशाला
लागो न दृष्ट माझी
माझ्याच वैभवाला
देवा दया तुझी रे ।।३।।

**चित्रपट - बोलकी बाहुली**

# बोलू दे लोकां हवे ते

संगीत - राम कदम

गीत - ग. दि. माडगुळकर

बोलू दे लोकां हवे ते
काय लोकांना कळे
आंधळयांनी कां म्हणावे
प्रेम असते आंधळे ।।धृ०।।

प्रेम वेडा मोर नाचे
प्रेम रंगी कौतुके
पंख तितुके नेत्र होती
स्वर्गही खाली झुके
प्रेमिकांचे विश्व आहे
विश्वाहुनि या वेगळे
आंधळयांनी का म्हणावे ।।१।।

जन्म कैलासात घेते
घे उडी ती भूतळी
सागरा जी अचूक मिळते
ती नदी कां आंधळी

परत फिरतो ओघ कां तो
लोकनिंदेच्या बळे
आंधळयांनी कां म्हणावे ॥२॥

माझिया प्रेमांधतेला
सूर्य चंद्राची दिठी
आडवे येऊन कोणी
मी तुझी रे शेवटी
बंधने देहास कोटी
प्राण माझे मोकळे
आंधळयांनी कां म्हणावे ॥३॥

**चित्रपट - प्रेम आंधळं असतं**

# आई सारखे दैवत साऱ्या

संगीत - दत्ता डावजेकर

गीत - ग. दि. माडगुळकर

सुमन - आई सारखे दैवत साऱ्या
जगतावर नाही
म्हणून 'श्री' काराच्या नंतर
शिकणे अ, आ, ई
मुलांनो, शिकणे अ, आ, ई
कोरस- हो ऽ ऽ हो ऽ ऽ शिकणे अ, आ, ई ।।धृ०।।

सुमन - तीच वाढवी ती सांभाळी
ती करी सेवा तीन त्रिकाळी
देवानंतर नमवी मस्तक
आईच्या पायी
कोरस - मस्तक आईच्या पायी ।।१।।

सुमन - कौसल्येविण राम न ठावा
देवकीपोटी कृष्ण जन्मला
शिवरायाचे चरित्र घडवी
माय जिजाबाई

कोरस - घडवी, माय जिजाबाई
सुमन - आई सारखे दैवत साऱ्या ॥२॥

सुमन - नकोस विसरू ऋण आईचे
स्वर्ग माऊली पुण्याईचे
थोर पुरुष तो ठरुनी तियेचा
होई उतराई
कोरस - हो ऽ ऽ ऽ हो ऽ ऽ होई उतराई
सुमन - आई सारखे दैवत साऱ्या ॥३॥

**चित्रपट- वैशाख वणवा**

# जिथे सागरा धरणी मिळते

| संगीत - वसंत प्रभू | गीत - पी. सावळाराम |
|---|---|

जिथे सागरा धरणी मिळते
तिथे तुझी मी वाट पहाते ।।धृ०।।

डोंगर दरीचे सोडून घर ते
पल्लव पाचूचे तोडून नाते
हर्षाचा जल्लोष करूनी जेथे
प्रीत नदीचे एकरूप ते ।।१।।

वेचित वाळूत शंख शिंपले
रम्य बाल्य ते जिथे खेळले
खेळाचा उल्हास रंगात येऊनी
धुंदीत यौवन जिथे डोलते ।।२।।

बघुनी नभीची चंद्रकोर ती
सागर हृदयी उर्मी उठती
सुखदु:खाची तेथे सारथी
प्रीत जीवनी ओढ लागते ।।३।।

**चित्रपट - पुत्र व्हावा ऐसा**

# असा मी काय केला गुन्हा

संगीत - राम कदम

गीत - जगदीश खेबुडकर.

सुमन - असा मी काय केला गुन्हा
गेला सोडुनि मजशी कान्हा
कान्हा ऽऽऽ कान्हा ऽऽऽ कान्हा ऽऽ ।।धृ०।।

कोरस - गेला गेला सोडुनि बाई हिला कान्हा
सुमन - गोकुळात मी रंगुन गेले
मनोमनी तर खूप नाचले
मुरलीचा मी सूर जाहले
अजून हृदयी त्याच खुणा
गेला सोडुनी मजशी कान्हा ।।१।।

कोरस - गेला गेला सोडुनी बाई हिला कान्हा
सुमन - तुझ्या प्रीतीची रीत निराळी
जीव लावूनी मनास जाळी
फसले रे मी राधा भोळी
सख्या मुकुंदा येई पुन्हा
गेला सोडुनी मजशी कान्हा ।।२।।

कोरस - गेला गेला सोडुनी बाई हिला कान्हा

सुमन - कान्हा ऽऽऽ कान्हा ऽऽऽ कान्हा

## चित्रपट - सोंगाड्या

# चांदणे झाले ग केशरी

संगीत - दत्ता डावजेकर | गीत - ग. दि. माडगुळकर

चांदणे ऽ ऽ ऽ
चांदणे ऽऽऽ झाले ग केशरी
केशरी, झाले ग केशरी
चांदणे झाले ग केशरी
पुसत नभाला तारा तोवर
अरुण उतरला घरी ।।धृ०।।

सरल्या काळया अबोल राती
नवचंद्रासम उजळे प्रिती
भावपौर्णिमा अंती बहरे
उभयांच्या अंतरी
चांदणे ऽऽऽ झाले ग केशरी ।।१।।

काल वाटली तुळस लाजरी
आज तिच्यावर दिसे मंजिरी
कृष्ण कडेवर घेई जणू ही

यशोमती सुंदरी
चांदणे ऽऽऽ झाले ग केशरी ॥२॥

मुक्या माऊली तुजसी सांगते
माझ्याही ऊरी गूज रांगते
सुखद वाटते गोवत्साची
म्हणून मला चाकरी
चांदणे ऽऽऽ झाले ग केशरी ॥३॥

**चित्रपट - वैशाख वणवा**

# जाग रे यादवा

संगीत - राम कदम

गीत - ग. दि. माडगुळकर

आ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
जाग रे यादवा ऽ ऽ कृष्ण गोपालका
फिकटल्या तारका रात सरली ऽ ऽ
जाग रे यादवा ऽ ऽ ऽ ।।धृ०।।

पक्षीगण जागले किलबिलू लागले
अजून कां लोचनी निज उरली
रात सरली ऽ ऽ ऽ
जाग रे यादवा कृष्ण गोपालका ।।१।।

उमलला फुलवरा गंध ये मोहरा
मंद यमुनाजळी झुळुक शिरली
रात सरली ऽ ऽ ऽ
जाग रे यादवा कृष्ण गोपालका ।।२।।

उठून गोपांगना करिती गो-दोहना
हर घरी जणू सुधा धार झरली
रात सरली ऽ ऽ ऽ
जाग रे यादवा कृष्ण गोपालका ॥३॥

निवळल्या दशदिशा अंबरी ये उषा
सोनियाने तिचे ओठ भरले
रात सरली ऽ ऽ ऽ
जाग रे यादवा कृष्ण गोपालका ॥४॥

**चित्रपट - प्रेम आंधळं असतं**

# कशी गौळण राधा बावरली

संगीत - राम कदम

गीत - शांता शेळके

कशी गौळण राधा बावरली
बावरली
कशी गौळण राधा बावरली ॥धृ०॥

जलभरणा यमुना गेली
शीळ खुणेची अवचित आली
रोमांचित काया थरथरली
बावरली
कशी गौळण राधा बावरली ॥१॥

कृष्ण सावळा गोरी राधा
कृष्ण सख्याची जडली बाधा
कृष्णच नेत्री कृष्णच गात्री
कृष्णात राधिका विरघळली
बावरली
कशी गौळण राधा बावरली ॥२॥

लाजेची ही वसने फिटली
लोकांमधुनी राधा उठली
राधा मोहन होता मीलन
हरीकांती तनूवर पांघरली
बावरली कशी गौळण राधा बावरली ।।३।।

**चित्रपट - एक गांव बारा भानगडी**

# दहा वीस असती त्या रे

संगीत - स्नेहल भाटकर

गीत - ग. दि. माडगुळकर

दहा वीस असती त्या रे
मने उध्दवा
एक मात्र होते ते मी
दिले माधवा ।।धृ०।।

पांच इंद्रियांचा मेळा
दास त्या मनाचा
तना-मना एकच माझ्या
ध्यास मोहनाचा
कुणीतरी मेघःश्यामा इथे आणवा ऽऽऽ
दहा वीस असती त्या रे मने उध्दवा ।।१।।

नसे देव ठावा मजला
राव द्वारकेचा
बाळकृष्ण ओळखते मी
सखा राधिकेचा

फेर धरा यमुनातीरी गोप नाचवा ऽऽऽऽ
दहा वीस असती त्या रे मने उध्दवा ॥२॥

एक स्पर्श व्हावा, यावा
वास कस्तुरीचा
एक हाक द्यावी, त्याला
सूर बासुरीचा
लोचनास माझ्या यावा पूर आसवा ऽऽऽ
दहा वीस असती त्या रे मने उध्दवा ॥३॥

**चित्रपट - अन्नपूर्णा**

# पार्वती वेची मृदुल करे

संगीत - दत्ता डावजेकर

गीत - ग. दि. माडगुळकर

पार्वती वेची मृदुल करे
बिल्व दळे
शिवमूर्तीचे करिती चिंतन
भावमुग्ध डोळे
पार्वती वेची मृदुल करे ..... ।।धृ०।।

धुके तरळते धुसर धुसर
भस्म माखले दिसे चराचर
उष:कालचा प्रहर निघे हा
भावरुप भोळे
पार्वती वेची मृदुल करे ..... ।।१।।

फुले लहडली प्राजक्तावर
प्राजक्तावर
तो तर भासे प्रसन्न शंकर
प्रसन्न शंकर

कोरस - ओम हरी ओम हरी ओम

सुमन - सुमने कसली हास्य हराचे
भूमीवर निखळे
पार्वती वेची मृदुल करे ..... ॥२॥

## चित्रपट - सुखाची सावली

काव्य

# दिवा पाहुनी लक्ष्मी येते

संगीत - प्रभाकर जोग

गीत - जगदीश खेबुडकर

सुमन - दिवा पाहुनी लक्ष्मी येते
करू तिची प्रार्थना, करू तिची प्रार्थना
शुभंकरोती म्हणा मुलांनो, शुभंकरोती म्हणा
कोरस- शुभंकरोती कल्याणम्, शुभंकरोती कल्याणम् ।।धृ०।।

सुमन - जेथे ज्योती तेथे लक्ष्मी
उभी जगाच्या सेवा धर्मी
दिशादिशातुन या लक्ष्मीच्या
दिसती पाऊलखुणा, दिसती पाऊलखुणा
शुभंकरोती म्हणा मुलांनो, शुभंकरोती म्हणा ।।१।।

कोरस - शुभंकरोती कल्याणम्, शुभंकरोती कल्याणम्
सुमन - या ज्योतीने सरे आपदा
आरोग्यासह मिळे संपदा
शत्रुबुध्दीचा विनाश होतो
सौख्य मिळे जीवना, सौख्य मिळे जीवना
शुभंकरोती म्हणा मुलांनो, शुभंकरोती म्हणा ।।२।।

कोरस - शुभंकरोती कल्याणम्, शुभंकरोती कल्याणम्

सुमन - दिव्या दिव्या रे दीपत्कार
कानी कुंडल मोतीहार

कोरस - दिव्या दिव्या रे दीपत्कार
कानी कुंडल मोतीहार

सुमन - दिव्यास पाहुन नमस्कार हा
रिवाज आहे जुना, रिवाज आहे जुना
शुभंकरोती म्हणा मुलांनो, शुभंकरोती म्हणा ।।३।।

## चित्रपट - थांब लक्ष्मी कुंकु लावते

# आशा मनात झुरते

संगीत - डी.एस.रूबेन

गीत - रमेश अणावकर

आशा मनात झुरते माझे म्हणु कुणाला
हा दोष ना तुझा रे अपराध मीच केला ।।धृ०।।

जे स्वप्न रेखिलेले माझ्याच मी मनाशी
ते स्वप्न आज माझे ठरवी मलाच दोषी
डोळयात आसवांची ही साक्ष या जगाला
हा दोष ना तुझा रे अपराध, मीच केला ।।१।।

धुंदीत यौवनाच्या ना ऐकिले कुणाचे
आलेच ना तसे ते मी ठरविले मनी जे
घडते घडायचे ते चुकली न दैवलीला
हा दोष ना तुझा रे अपराध मीच केला ।।२।।

निष्पाप अंतरीची प्रीती तुझी अमोल
जाणीव आज गेली माझ्या मनात खोल
बदनाम तूं म्हणावी ही एक आस मजला
हा दोष ना तुझा रे अपराध मीच केला ।।३।।

चित्रपट - अधिकार

# दूर राहिले जग स्वार्थाचे

संगीत - राम कदम

गीत - ग. दि. माडगुळकर

तो - दूर राहिले जग स्वार्थाचे
वळून नको पाहू
सखे चल दूर दूर जाऊ ॥धृ०॥

निळे सावळे वरती अंबर
तळी असावा अथांग सागर
बेट मधोमध हिरवे सुंदर
लक्ष युगे राहु
सखे चल दूर दूर जाऊ ॥१॥

ती - त्या बेटावर नगर नसावे
ओ ऽ ऽ ऽ ऽ
निसर्ग वैभव मुक्त असावे
दोन जिवांचे राज्य वसावे
राजहंस ते नांदू तेथे
खगापरी गाऊ
सख्या चल दूर दूर जाऊ ॥२॥

तो - शांत सुरक्षित स्थल हे रमणी
आ ऽऽऽऽ
जळी तरंगे दुसरी भरणी
स्नेहल शांती वातावरणी
झाडे वेली करीती स्वागत
उंचावून बाहु
सखे ग सुखे इथे राहू
ती - सख्यारे सुखे इथे राहू ॥३॥

**चित्रपट - प्रेम आंधळं असत**

# सांग कधी कळणार तुला

संगीत - एन. दत्ता

गीत - मधुसुदन कालेलकर

तो - सांग कधी कळणार तुला भाव माझ्या मनातला ऽऽऽ
ती - रंग कधी दिसणार तुला लाजणाऱ्या फुलातलाऽऽऽ ।।धृ०।।

तो - निळसर चंचल पाण्यावरती लयीत एका तरंग उठती
छंद कधी कळणार तुला नाचणाऱ्या जळातला
सांग कधी कळणार तुला भाव माझ्या मनातला ।।१।।

ती - गंधित नाजुक पानामधुनी सूर छेडिते अलगद कोणी
अर्थ कधी कळणार तुला धुंदणाऱ्या सुरातला
रंग कधी दिसणार तुला लाजणाऱ्या फुलातला ।।२।।

चित्रपट - अपराध

# कालिंदीच्या तीरी मधुर ही

संगीत - डी.एस.रूबेन

गीत - रमेश अणावकर

कालिंदीच्या तीरी मधुर ही
बघुनी श्याम सुलोचन
राधा गौळण गेली हुरळून ।।धृ०।।

हरीकांतीचे वल्कल लेवून
त्या वेळी ती भोळी गौळण
हरीच्यासंगे हरीला बिलगून
भक्तिरसातून तन मन विसरून ।।१।।

गोकुळवासी कुणीही तिजला
कितीही हसु दे खंत न कसला
भाव फुलांची गुंफित माला
खुलवी कसा रे नवरस जीवन ।।२।।

राधासंगे वेळी अविरत
श्रीकृष्णाच्या लीला अगणित
अर्थ त्यातला राहील जाणीत
मुक्तीसंगे होई समर्पण ।।३।।

चित्रपट · अधिकार

# निंबोणीच्या झाडामागे

संगीत - एन. दत्ता

गीत - मधुसुदन कालेलकर

निंबोणीच्या झाडामागे, चंद्र झोपला ग बाई
आज माझ्या पाडसाला, झोप कां ग येत नाही ।।धृ०।।

गाय झोपली गोठ्यात, घरट्यात चिऊताई
परसात वेलीवरी निजल्या ग जाई जाई
मीट पापण्या डोळयांच्या गाते तुला मी अंगाई ।।१।।

देवकी नसे मी बाळा भाग्य यशोदेचे भाळी
तुझे दुःख घेण्यासाठी केली पदराची झोळी
जगावेगळी ही ममता, जगावेगळी अंगाई ।।२।।

रित्या पाळण्याची दोरी, ऊरे आज माझ्या हाती
स्वप्न एक उधळून गेले माय लेकराची नाती
हुंदका गळयाशी येता गाऊ कशी मी अंगाई ।।३।।

चित्रपट - बाळा गाऊ कशी अंगाई

# दे मला तू साथ वीणे

संगीत - वसंत पवार

गीत - मधुसुदन कालेलकर

दे मला तूं साथ वीणे
तुझिया झंकारात, वीणे
दे मला तू साथ ।।धृ।।

शिरिष सुमाच्या परागापरी
सुमधुर कोमल भाव अंतरी
जाणवते मज तीच माधुरी
तुझिया झंकारात ।।१।।

कोजागिरीच्या चांदण्यातले
अमृतकण मी हळूच वेचिले
गीत मालिकेमध्यें गुंफिले
गाऊनी सप्तसुरात ।।२।।

रोज रोज हे स्वप्नी येते
जागेपणी मी बोलू न शकते
गोड गूज ते आज सांगते
सखये तव कानात ।।३।।

चित्रपट - झाकली मूठ

# तुझ्या कांतीसम रक्तपताका

संगीत - स्नेहल भाटकर

गीत - ग. दि. माडगूळकर

तुझ्या कांतीसम रक्तपताका
पूर्व दिशी फडकती
अरुण उगवला प्रभात झाली
उठ महागणपती, उठ महागणपती ।।धृ०।।

सूर्याआधी दर्शन घ्यावे
तुझे मूषकगजा
शुभद सुमंगल सर्वाआधी
तुझी पाद्यपूजा
छेडूनी वीणा जागविते तुज
सरस्वती भगवती ।।१।।

आवडती तुज म्हणून आणिली
रक्तवर्ण कमळे
पाचू मण्याच्या किरणासम ही
हिरवी दुर्वादळे

उभ्या ठाकल्या चवदा विद्या
घेऊनिया आरती ।।२।।

शूर्पकर्णका उठ गजमुखा
उठी रे मोरेश्वरा
तिन्ही जगाचा तूच न्नियंता
विश्वासी आसरा
तुझ्या दर्शना अधिर देवा
हर, ब्रम्हा, श्रीपती ।।३।।

**चित्रपट - अन्नपूर्णा**

# कशी करु स्वागता

संगीत - सुधीर फडके

गीत - ग.दि. माडगूळकर

कशी करु स्वागता ऽ ऽ २
एकांताचा आरंभ कैसा
असते कशी सांगता ऽ ऽ ॥धृ०॥

कशी हसू मी कैसी बोलू
किती गतीने कैसी चालू
धीटपणाने मिठी घालू का
कवळू तुज नाथा ॥१॥

फुलते कळी का फुलवी वारा
चंद्र हसवी की हसवी तारा
कुठले आधी कुठले नंतर
येई ना सांगता ॥२॥

कुणी न पुढती येई येई
कुणी न पाठी

३२

घरात आहे मीच एकटी
प्रथम दर्शनी बोलायाचा
भाव तरी कोणता ।।३।।

**चित्रपट - मुंबईचा जावई**

REFBK-0026463
REFBK-0026463

# ये ना जवळी

संगीत -

गीत -

ये ना सजली स्वप्ने नयनी
ये ना ये ना ये ना ॥धृ॥
हसती लहरी चंद्रा बघुनी
हसते कलिका भ्रमरा भुलुनी
झुरते मिलनी हळवी रजनी
ये ना सजली स्वप्ने नयनी ॥१॥

मेघा मधुनी सुटावी बिजली
नवख्या हृदयी धुंदी भरली
घे ना जवळी आपुली म्हणुनी
ये ना सजली स्वप्ने नयनी ॥२॥

कितीदा विनवु तुजला अजुनी
जळते अधिर विरही हरिणी
कां रे छळिसी सारे कळुनी
ये ना सजली स्वप्ने नयनी ॥३॥

चित्रपट - पारध

# अरे संसार संसार

संगीत -

गीत - बहिणाबाई

अरे संसार संसार, जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताला चटके तेव्हा मिळते भाकर ।।धृ।।

अरे संसार संसार खोटा कधी म्हणू नये
राऊळाच्या कळसाला लोटा कधी म्हणू नये ।।१।।

अरे संसार संसार नाही रडण कुढण
येडया गळयातला हार म्हणु नको रे लोढणं ।।२।।

अरे संसार संसार दोन जीवाचा विचार
देतो सुखाला नकार आणि दुःखाला होकार ।।३।।

अरे संसार संसार दोन जीवांचा सुधार
कधी नगद उधार सुख दुःखाचा व्यापार ।।४।।

चित्रपट - मानिनी

## आमची कांही अन्य आकर्षक स्वरूपातील प्रकाशने

१) मराठी शब्दसागर (मराठी - मराठी कोश)

२) मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी
- वा. गो. आपटे २१/- रु

३) हसणावळ (विनोदी चुटक्यांचा अप्रतिम संग्रह)

सौ. सुचिता प्रभाकर आवटी यांनी संग्रहित केलेली

**गाजलेल्या गाण्यांची पुस्तके**

४) लता मंगेशकर
५) आशा भोसले
६) सुधीर फडके
७) माणिक वर्मा
८) अनुराधा पौडवाल व अरूण दाते
९) सुमन कल्याणपुर

## योगेश्वर प्रकाशन, डोंबिवली (पूर्व)